मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च, २०२४
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष चोविसावे
अंक तिसरा



लक्ष्मीकांत देशमुख लिखित 'फ्रीडम ऑन फायर' कथासंग्रह प्रकाशन सोहळा

यावेळी मा. गौतम बंबावले (चीन व पाकिस्तानचे माजी राजदूत), मा. व्होलोडीमीर प्रयतुला (द्वितीय सचिव, युक्रेनचे राजदूत), मा. डॉ. महेंद्र कदम (समीक्षक व लेखक), मा. भारत सासणे (लेखक, माजी संमेलनाध्यक्ष), मा. लक्ष्मीकांत देशमुख (लेखक, माजी संमेलनाध्यक्ष), 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे व्यवस्थापकीय संचालक मा. अखिल मेहता व साहिल मेहता इ. मान्यवर उपस्थित होते.



मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०२४ ◆ वर्ष चोविसावे ◆ अंक तिसरा

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
प्रतीक येतावडेकर

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	**४**
पुरस्कार	**१०**
प्रकाशन	**११**
वितरकाच्या नजरेतून	**१२**
अध्यक्षीय भाषण	**१६**
दिनविशेष	**६०**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

साहित्य संमेलनाचे नेटके नियोजन

शताब्दीकडे वाटचाल करणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ही मराठी साहित्य विश्वासाठी एक अभिमानाची बाब. ९७वे मराठी साहित्य संमेलन साने गुरुजींची कर्मभूमी असणाऱ्या खानदेशातील अमळनेर येथे पार पडले. खानदेश म्हणजे संत मुक्ताबाई, पूज्य साने गुरुजी आणि ज्ञानपीठ सन्मानित भालचंद्र नेमाडे यांची भूमी. १९५२ साली ३५वे साहित्य संमेलन प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते. तब्बल ७२ वर्षांनंतर पुन्हा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्याची संधी अमळनेरकरांना यावर्षी मिळाली.

साहित्य संमेलनाचे आयोजन करणारे मराठी वाङ्मय मंडळ, अमळनेर; यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे साहित्यविषयक उपक्रम राबवून वाचक घडवणे. त्या संस्थेलाही स्वत:ची अशी एक ओळख आहे. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण अलीकडील काही काळात रूढ झालेले आपल्याला पाहायला मिळते. त्याला काहीसा अपवाद ठरणारे हे संमेलन होते, असे इथे नमूद करावेसे वाटते. संमेलने ही राजकीय व्यासपीठे होत आहेत का, हा एक कळीचा मुद्दा दरवेळेस चर्चेला येतो आणि

पुन्हा तो बासनात गुंडाळला जातो. त्यामुळे त्यावर काही भाष्य करण्यात तसा अर्थ नाही.

आयोजक संस्थेने नेटकेपणाने केलेले नियोजन, जाहिराती या संमेलन यशस्वी होण्याच्या दृष्टीने जमेच्या अशा बाजू म्हणता येतील. ग्रंथप्रदर्शनासाठी जी 'ग्रंथनगरी' उभारली गेली होती तेथील व्यवस्थाही समाधानकारक अशी होती. पुरेशी अशी लाइटव्यवस्था, पंखे, तसेच स्टॉलधारकांसाठी प्यायच्या पाण्याची व्यवस्था या गोष्टी पाहता या वेळचा अनुभव हा सुखावणारा होता. आयोजन समितीतील जबाबदार पदाधिकारी सर्व गोष्टींवर लक्ष ठेवून होते. समितीत काम करणाऱ्या लोकांच्या सहकार्याचे चित्र सर्व बाबींवर उठून दिसत होते.

एखाद्या मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन करायचे म्हणजे अधिक-उणे हे ओघाने आलेच. शहरी भागात घेतली गेलेली संमेलने ही कायमच चर्चिली जातात; मात्र आडगावात अथवा गावपातळीवरील संमेलनांची तितकीशी चर्चा होताना दिसून येत नाही. खरंतर साहित्य संमेलने ही वारंवार ग्रामीण भागांत आयोजित केली गेली पाहिजेत. त्या निमित्ताने सर्व स्तरांतील वाचकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न होईल आणि मराठी साहित्याबद्दलची आवड वाचकांच्या मनात पुन्हा रुजेल.

९६व्या साहित्य संमेलनाच्या तुलनेत ९७वे साहित्य संमेलन हे व्यवस्थापनाच्या बाबतीत सरस असेच म्हणावे लागेल. अमळनेरसारख्या तालुका पातळीवरील गावात असणारा सजग असा वाचक आणि त्याच्याकडून चोखंदळपणे केली गेलेली पुस्तकखरेदी ही तेथील वाचकांना साहित्याबद्दल असलेल्या आस्थेचाच भाग होती.

ज्येष्ठ गीतकार व पटकथाकार गुलजार साहेब यांना सन २०२३चा ज्ञानपीठ सन्मान जाहीर झाला आहे. गुलजार साहेब आणि मेहता पब्लिशिंग हाऊस यांचा ऋणानुबंध तसा खूप वर्षांचा.

मराठीत गुलजार यांची पुस्तके प्रथम आणली ती मेहता पब्लिशिंग हाऊसनेच. गुलजार यांचे 'धागे' हे पुस्तक कोल्हापूर सकाळ आवृत्तीत लिहिल्या गेलेल्या सदरांचे संकलन असून, त्या निमित्ताने गुलजार साहेब आणि कोल्हापूर यांच्यातील ऋणानुबंधाचे स्मरण झाले. गुलजार यांच्या पटकथा, 'त्रिवेणी,' 'धागे', 'रावीपार' ही गुलजार साहेब यांची पुस्तके आमच्या ग्रंथसूचीची समृद्धता अधोरेखित करत असतात. ज्ञानपीठ हा सर्वोच्च सन्मान मिळाल्याबद्दल गुलजार साहेब यांचे आम्ही मनापासून अभिनंदन करतो.

या अंकात संमेलनाध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे यांचे अध्यक्षीय भाषण सर्व वाचकांसाठी उपलब्ध करून देत आहोत.

अखिल मेहता

फेब्रुवारी महिन्याच्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'मराठी भाषा गौरव दिन' ऐवजी 'मराठी राजभाषा दिन' असा उल्लेख अनवधानाने झाला आहे, त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकी हक्कासंबंधीचे निवेदन

१) नियतकालिकाचे नाव	:	मेहता मराठी ग्रंथजगत
२) प्रकाशन स्थळ	:	१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)
३) प्रकाशन काल	:	मासिक
४) मुद्रकाचे नाव	:	अखिल सुनील मेहता
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)
५) प्रकाशकाचे नाव	:	अखिल सुनील मेहता
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)
६) संपादक	:	अखिल मेहता
राष्ट्रीयत्व	:	भारतीय
पत्ता	:	१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)
७) मुद्रण स्थळ	:	जय गणेश ऑफसेट, २०/१डी/ १ए, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११ ०११ (महाराष्ट्र)
८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव	:	अखिल सुनील मेहता
कार्यालयाचा पत्ता	:	१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र)

मी, अखिल सुनील मेहता, असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दि. ११.३.२०२४

अखिल सुनील मेहता
प्रकाशक

मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छपील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

Available on

amazonkindle | Google Play Books

Find us on:
facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

available on :
ebook

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

पुरस्कार

ज्ञानपीठ पुरस्कार

ज्येष्ठ कवी-गीतकार गुलजार यांना त्यांच्या भारतीय साहित्यातील योगदानासाठी २०२३चा 'ज्ञानपीठ पुरस्कार' जाहीर झाला आहे. २००२च्या 'साहित्य अकादमी' पुरस्काराचेही ते मानकरी आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसने गुलजार साहेबांची गुलजार पटकथा (सहा पुस्तकांचा संच), 'त्रिवेणी,' 'रावीपार', 'धागे' ही पुस्तकं अनुवादित स्वरूपात प्रकाशित केली आहेत. वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज, के. शिवराम कारंत, यू. आर. अनंतमूर्ती, महाश्वेतादेवी आणि अमिताव घोष हे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते आमच्या सूचीत विराजमान आहेत. त्यात आता गुलजार साहेबांची भर पडली. गुलजार साहेबांना साहित्यातील हा मानाचा समजला जाणारा पुरस्कार मिळाल्याबद्दल मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे त्यांचं मन:पूर्वक अभिनंदन!







प्रकाशन

'फ्रीडम ऑन फायर' पुस्तकाचे प्रकाशन

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'फ्रीडम ऑन फायर' या कथासंग्रहाचं प्रकाशन युक्रेन दूतावासाचे द्वितीय सचिव-व्होलोडीमीर प्रयतुला,चीनमधील माजी भारतीय राजदूत-गौतम बंबावले यांच्या हस्ते करण्यात आले.

''देशमुखांनी मराठीत युद्धकथा आणल्या व विश्वकरुणेचा शोध घेतला.या पार्श्वभूमीवर देशमुखांचा हा युद्धकथासंग्रह महत्त्वाचा आहे,'' असे भारत सासणे यावेळी म्हणाले.

''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची, 'वसुधैव कुटुंबकम्' भूमिका युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी साहायक ठरावी,'' अशी आशा प्रयतुला यांनी व्यक्त केली.

''भारत देश,रशिया-युक्रेन युद्धाकडे धोरणात्मकतेने पाहतो; रोमॅण्टिसिझिमने नाही. भारत या युद्धाचे समर्थन करत नाही.'' असे माजी राजदूत गौतम बंबावले म्हणाले.

''मध्यमवर्गीय माणूस क्रांतीशी जोडला गेला आहे, हे या कथा सांगतात व नेमकं वैचारिक बीजही मांडतात, असे समीक्षक महेंद्र कदम यावेळी म्हणाले. ''रशिया-युक्रेन या विषमशक्तीच्या लादलेल्या युद्धाला दोन वर्षं झाली; पण साम्राज्यवादीवृत्ती गेली नाही.विश्वनागरिक म्हणून आपण आपली भूमिका मांडली पाहिजे,'' असे मत लेखक लक्ष्मीकांत देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले. पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात, प्रकाशक-अखिल मेहता यांच्या उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

◆

वितरकाच्या नजरेतून

मी पुस्तक विक्री व्यवसायात १९९६ साली आलो. निमित्त होते-टी.वाय.बी.ए.चे. ठाण्यात ज्ञानसाधना महाविद्यालयात मी शिकत होतो. मराठी वाङ्मय मंडळाचं उद्घाटन होतं. या कार्यक्रमास त्यावेळचे प्रसिद्ध कवी चंद्रशेखर गोखले यांना आमंत्रित केलं होतं. त्या कार्यक्रमात गोखले यांनी आणलेली पुस्तके मी घेऊन मागे टेबलावर बसलो. 'मी माझा', 'पुन्हा मी माझा' अशी दोन पुस्तके होती. या दोन पुस्तकांच्या २५-२५ प्रती होत्या. त्यांची १५ मिनिटांत विक्री झाली.

कार्यक्रम संपल्यानंतर गोखले मला पार्लेत घेऊन गेले. माझं काम करशील का, असं विचारलं आणि वितरण व्यवसायाची सुरुवात झाली. गोखलेंच्या, 'मी माझा' या काव्यसंग्रहातील

पुसणार कुणी असेल तर
डोळे भरून यायला अर्थ आहे
कुणाचे डोळे भरणार नसतील
तर मरणसुद्धा व्यर्थ आहे.

ही चारोळी मनाला खूप काही सांगून गेली. थोडं थोडं वाचन करू लागलो. बेबी कांबळे यांचं, 'आमचं जिणं', विश्राम बेडेकर यांचं, 'रणांगण', कमल गोखले यांचं, 'शिवपुत्र संभाजी', रणजित देसाई यांचं, 'राधेय' पुस्तक. ही पुस्तके मला खूपच आवडलेली. पदवीधर झाल्यानंतर मग याच व्यवसायात पडलो. १९९८ ला प्रथमच पुण्यात आलो. नामांकित प्रकाशन संस्था शोधून काढल्या व थोडी थोडी पुस्तके आणून मुंबईत विक्री सुरू केली. हळूहळू जम

बसू लागला आणि पुढे ओळखीही वाढत गेल्या.

ज्येष्ठ प्रकाशक-सुनील मेहता, गुलाबराव सपकाळ, उपेंद्र कुलकर्णी रवि बेहेरे या मंडळींनी सहकार्य करण्यास सुरुवात केली आणि माझ्या कामाची या क्षेत्रातली मोठी कामगिरी सुरू झाली. १९९६ ते २०१४ या दरम्यान ललित साहित्याला मोठी मागणी होती. दर मंगळवारी-गुरुवारी व शनिवारी मी पाच-सहा पिशव्या घेऊन पुण्याला येत असे (अजूनही येतोच) व दुसऱ्या दिवशी मुंबईतील दुकानदारांना पुस्तके देत असे. आदल्या दिवशी सांगितलेली पुस्तके लगेच दुसऱ्या दिवशी मिळायला लागली. त्यामुळे दुकानदारांनी चांगला प्रतिसाद दिला. फक्त पाच टक्के नफा ठेवून मी त्यांना पुस्तके पुरवू लागलो. खूप ऑर्डर्स मिळू लागल्या. या दरम्यान काहीजण मुंबईत छोटी छोटी प्रदर्शने भरवत असत; त्यांनाही मी पुस्तके देत असे. छोट्या सोसायटीत चार टेबल लावून फक्त शनिवार-रविवार व्यवसाय करणारे चार-पाच विक्रेते होते. फिरते ट्रक प्रदर्शन भरवणारेही काहीजण होते; त्याचं कौतुकच आहे. या मंडळींची मेहनत, पुस्तक लावण्याची पद्धत अफलातूनच असते. एकदा २०१४ ला काय झालं याचं नेमकं कारण मला सांगता येणार नाही; पण या व्यवसायाला उतरती कळा लागली. २०१४ ते २०१८ या काळात विक्री खूपच थंडावली. पुढे कोरोना आला, मग तर पूर्ण २०१९-२०-२१ साली पुस्तक विक्री जवळ जवळ बंदच म्हटले तरी चालेल, अशी स्थिती झाली.

त्यानंतर मग २०२२ पासून पुन्हा पुस्तक विक्री सुरू झाली, ती आजतागायत जोरात सुरू आहे. या दरम्यान अनेक प्रकाशकांनी दर्जेदार साहित्यनिर्मिती करून मराठी साहित्यात व इतर नवीन विषयांच्या पुस्तकांत चांगलीच भर घातली. चांगल्या-रसिकवाचकांचा साहित्यकृतीवर होणारा संवाद हा मनाला आनंद देऊन जातो. मराठी साहित्याच्या वाचनाने, समाजातील आंधळ्या रूढींचा नायनाट झाला. मुंबई ही भुलभुलैय्या असणारी, 'मायानगरी' असली तरी मराठी पुस्तकांची कोट्यवधी रुपयांची उलाढाल तेथे चालते. या नगरीत श्रम आणि जिद्द या गोष्टी तुमच्याकडे असतील तर या व्यवसायासारखा श्रीमंत व्यवसाय नाही, असं मला वाटतं.

अत्याधुनिक कितीही उपकरणे आली, तरी पुस्तक विकत घेऊन वाचणारा रसिक वाचक मोठ्या प्रमाणावर आहे, याचे समाधान वाटते. दरवर्षी वेगवेगळे

उपक्रम राबवून पुस्तक विक्रीची ठिकाणे वाढत आहेत. अशा ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता मुंबईत नवीन पिढी आपल्या आई-वडीलांची 'ग्रंथतुला' करत आहे, ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. 'ग्रंथतुले'साठी किमान ५० किलो ते ६० किलो पुस्तकं लागतात. पंचवीस ते तीस हजारांपर्यंत सहज बजेट जातं. हळूहळू ही गोष्ट समाजात रुजली पाहिजे. 'ग्रंथतुले'साठी घेतलेली पुस्तके त्याच कार्यक्रमात सगळ्या नातेवाइकांना वाटली जातात, ही एक चांगली गोष्ट आहे.

नवसाहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न विक्रेत्यांनी केला पाहिजे. खेडोपाडी ग्रामपंचायतींची ग्रंथालये सुरू केली गेली आहेत. याला बऱ्यापैकी प्रतिसाद मिळत आहे. एखादं पुस्तक दुर्मिळ असेल तर ते वाचकांना मिळवून दिलं, तर तो आनंद अनोखा असतो, तसेच तो ग्राहक कायमचा बांधला जाऊन आणखी काही ग्राहक देत असतो. अनेक वर्षं मला या व्यवसायात सफलता व आनंद मिळत आहे. तुम्ही जेवढं कराल तेवढ कमीच आहे.

मुंबईत अजूनही उपनगरांत पुस्तके मिळत नाहीत. ही दखल आपण घेतली पाहिजे. तेथे पुस्तके पोहचवण्याचा प्रयत्न करावयास हवा.

आजच्या धकाधकीच्या जीवनात आपण चिंतेत किवा अस्वस्थ असल्यावर मार्ग सुचत नसेल तर एखादी चांगली कथा वाचली तर आपल्याला सकारात्मक उर्जा मिळते, ही मराठीची खासियत आहे. माणसाचं जीवन हे आनंदी जगण्यासाठी आहे, ऊर फुटेपर्यंत धावण्यासाठी नाही, हे पुस्तके शिकवितात. जगण्यातला आनंद कशात आहे, तो शोधण्याची दृष्टी या क्षेत्रात आहे. प्रकाशक-विक्रेते-वाचक यांचं नातं जिव्हाळ्याचं असलं पाहिजे. चांगल्या विचारांची देवाण-घेवाण झाली पाहिजे. शेवटी पुस्तकविक्रीचं श्रेय हे वाचकांचेच आहे.

तुकारामापासून अगदी कोल्हटकरांपर्यंतचा मराठीचा प्रवास अगदी वाखाणण्यासारखाच आहे, असं मला वाटतं.

शेवटी–

'Bookselling business is one of honor and financial gain'

– गोवर्धन भोसले , ग्रंथपंढरी-ठाणे.

नवी संहिता... नवा आशय...

एका अपरिचित गांधीची आत्मकथा

नटवर गांधी

अनुवाद

सुषमा शाळिग्राम



मुंबईतील असह्य आर्थिक ओढाताण ते अमेरिकेतील सुसंपन्न जीवन ...
नटवर गांधींचा संघर्षमय; तरीही यशस्वी जीवनप्रवास.

किंमत : ४६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

द गोल्डन एज

जोन लंडन

अनुवाद

विजय परांजपे

फ्रँक आणि एल्सा आहेत पोलिओग्रस्त...
पण मनाला त्यांच्या लागलेत पंख

किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

अध्यक्षीय भाषण

मराठी भाषेच्या नितांत प्रेमापोटी या सभामंडपात जमलेल्या तमाम मराठी भाषाभिमानी आणि साहित्यप्रेमी बंधू आणि भगिनींनो -

सर्वप्रथम आपणास मानाचा मुजरा.

अमळनेरच्या पावन भूमीत आयोजित होत असलेल्या या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या या उद्घाटनप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित असलेल्या तमाम महानुभावांना सर्वप्रथम मी मनापासून अभिवादन करतो. या साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी गेले पाच महिने तन-मन-धनाने जीवाचे रान करून कष्ट उपसणाऱ्या या मंडळींच्या चेहऱ्यावरून आज ओसंडून वाहणारा हा आनंद पाहून मी कृतकृत्य झाल्याची भावना माझ्या मनात आहे. माझे कृतकृत्य होणे यासाठी मी नमूद करतो की आधी मी साहित्यक्षेत्रात वावरणारा एक हाडाचा कार्यकर्ता आहे. त्यामुळे कार्यकर्त्याच्या मनात या क्षणी कुठल्या भावना असू शकतात, याचा मला अंदाज आहे. आणि माझ्यासाठी आजचा हा प्रसंग म्हणजे अपूर्व भाग्याचा क्षण आहे. या क्षणाची साक्षीदार ही भूमी आहे. १९५२ साली याच भूमीत तेव्हा ओळखले जाणारे महाराष्ट्र साहित्य संमेलन प्रा. कृ. पां. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. प्रा.कृ.पां. कुलकर्णी हे भाषाभ्यासक होते. पूज्य साने गुरुजींच्या मृत्यूला केवळ दोन वर्षे झाली होती तेव्हा इथे ते साहित्य संमेलन झाले होते. आज साने गुरुजींचे १२५ वे जन्मवर्ष म्हणजे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष गेल्या डिसेंबरपासून सुरू झाले आहे. आणि आज अशा पर्वावर या व्यासपीठावर मराठी

साहित्याची आपल्यापरीने बरी-वाईट सेवा करणाऱ्या एका सर्जनशील लेखकाला आपण अध्यक्षपदाचा मान दिला. मराठी साहित्य संमेलनाची परंपरा फार मोठी आहे. १८७८ पासून सुरू झालेल्या या परंपरेत उत्तुंग प्रतिभेची आणि प्रखर बुद्धिमत्ता असलेली वैचारिक शिखरे म्हणून ओळखली जाणारी मराठी साहित्यातील मोठी व्यक्तिमत्त्वे साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर विराजमान होऊन ही साहित्य संमेलनाची परंपरा अधिक देदीप्यमान झालेली आहे. त्यामुळे माझ्यावर या परंपरेचे स्मरण करताना काहीसे दडपण आलेले आहेच. अर्थात हे दडपण त्यांच्याविषयी असलेल्या भक्तिभावातून, अतीव आदरातून असू शकते, हेही नाकारता येत नाही. आता 'परंपरा-भाग्ययोग' असे शब्द वापरणे म्हणजे आपण एकदम उजवे वगैरे होऊन जातो; पण या डाव्या-उजव्याच्याही पलीकडे एक मोठा, विश्वव्यापी पसारा आपल्या सभोवती असतो, हे नाकारता येत नाही.

अमळनेरच्या भूमीविषयी

अमळनेर या भूमीची महती पुन्हा मी सांगायची गरज नाही. ही भूमी परमपूज्य साने गुरुजी यांच्या कर्तृत्वाने, संस्कारांनी पावन झालेली भूमी आहे. मराठी कवितेला सोन्याचा हंडा बहाल करणाऱ्या बहिणाबाई चौधरी यांच्या नावाने मराठी साहित्यविश्वात अजरामर झालेला हा परिसर आहे. निसर्गकवी ना. धों. महानोर इथल्याच भूमीतले. इथल्या दैवतांचा विचार करावयाचा झाला तर इथे मंगळ ग्रहाचे पूर्वापार मंदिर आहे. हा उल्लेख करताना आपल्या भारत देशानेही मंगळावर यान पाठवून सात वर्षे पूर्ण केलीत, याचाही उल्लेख करणे मला महत्त्वाचे वाटते. वारकरी संप्रदायाचे इथले अध्वर्यू समजले जाणारे संत श्री सखाराम महाराज यांच्या कार्याचा प्रभाव आणि परंपरा जवळजवळ साडेतीनशे वर्षांपासून जिवंत आहे. प्रति पंढरपूर म्हणूनही या भूमीची महती आहे. या भूमीत रुजलेले आणि लोकमानसात रूढ झालेले हे संस्कार आजही तेवढ्याच श्रद्धेने जपले जातात. ग्रामीण जनजीवनात सगळ्याच परंपरा, रीतिभाती या अशा दैवतांना वाट पुसत प्रवाहित झालेल्या असतात. कदाचित आपणांस माझ्यापेक्षाही या परंपरेची अधिक माहिती असणार. तथापि, या परंपरांना, जनमानसातील अक्षय प्रवाहाला अभिवादन करणे हे माझे मी प्रथम कर्तव्य समजतो. आणखी एक

गोष्ट अधिक ठळकपणे नमूद करणे आवश्यक आहे. आणि ती म्हणजे इथले संशोधन केंद्र. प्राचीन, दुर्मिळ ग्रंथ अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देणारे हे प्रताप तत्त्वज्ञान मंदिर पाहिले तर कुणीही हेवा करावा अशी ही वास्तू आहे. याच भूमीत अझीम प्रेमजी यांनी विप्रोचा पहिला कारखाना काढला. इथे कापडाची निर्मितीही कोणेएकेकाळी मोठ्या प्रमाणात होत होती. आणि म्हणूनच मी या सगळ्यांपुढे विनम्रभावाने उभा आहे.

१९५२ साली ३५ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात कृ.पां. कुलकर्णी यांनी साने गुरुजी यांच्या स्त्री-गीतातील एक ओवी उद्धृत केली होती. ती अशी-

पंढरीचा देव । अमळनेरी आला।

भक्तीला लुब्ध झाला । पांडुरंग।।

याच भूमीचे सद्गुरू श्री सखाराम महाराज वेगळ्या शब्दांत वर्णन करतात-

गाव अमळनेर । पुन्नाईत जागा

समाधानी पुढे । बोरी वाहे चंद्रभागा ।।

याच बोरी नदीने माधव ज्युलियन यांच्या 'संगमोत्सुक डोह', 'विरहतरंग', 'सुधारक' या काव्यांना स्फूर्ती दिली आहे. अशा या भूमीत आपण आज ९७व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनासाठी जमलो आहोत.

धर्म आणि लेखकाचा धर्म

मित्रहो, मराठी समाजात-महाराष्ट्रात तीन वेडं महत्त्वाची मानली जातात. त्यातील तिसरे आणि महत्त्वाचे वेड साहित्य संमेलन परंपरा हे होय. साहित्य संमेलने भरवावीत की नाही इथपासून संमेलनासाठी जिवाचे रान करणाऱ्या वेड्या माणसांपर्यंत ही परंपरा आपल्यासमोर उभी आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद आपल्या पदरी पडणे म्हणजे आपल्या लेखकीय जीवनातला अंतिम सन्मान अशी धारणा बहुतेकांची असते. माझीही ती आहे; कारण या निमित्ताने त्या लेखकाला महाराष्ट्रात, मराठी साहित्यप्रेमींमध्ये कमालीचा आदर, प्रेम मिळते, हा माझा अनुभव मी सांगू शकतो. साहित्य संमेलनांच्या विरोधात ओरड करणाऱ्यांना आपण सोडून देऊ या; कारण अशी ओरड करणारेही कुठल्यातरी संमेलनाचे

अध्यक्ष होतातच. किमान एखाद्या मोठ्या परिसंवादाचे अध्यक्ष होतात. त्यांच्या मते अशा - म्हणजे अखिल भारतीय साहित्य संमेलनातून कुठलाही विचार दिला जात नाही; पण या संमेलनातील अध्यक्षीय भाषणांपासून सगळ्याच भाषणांची मोठी चर्चा होते. आपल्या अनेक पूर्वाध्यक्षांनी याच व्यासपीठावरून अनेक नवे वाङ्मयीन प्रमेये मांडलीत, घमासान वैचारिक वादविवाद झडलेत - हे कसे नाकारता येईल? काहींचे म्हणणे असे की अलीकडे सुमारांची फार सद्दी झालेली आहे. अर्थात या मुद्द्यावर मी पुढे विस्ताराने येईनच. तूर्तास एवढेच म्हणेन की अशा महानुभावांनी आपल्या डोळ्यांवरचे चष्मे उतरवून आपलेच परखड मूल्यांकन करावे; कारण हे जागतिक दर्जाचेच तथाकथित प्रतिभावंत, विचारवंत असतात. आणि त्यांचे जग त्यांच्या कडबोळ्यापलीकडे जात नाहीच; पण असा सुमार वगैरे मुद्दा मांडला की आपण फार मोठे आहोत अशा भ्रमात त्यांनी आपली हयात घालवलेली असते.

मी अद्याप लिहिता लेखक आहे. फिरता लेखक आहे. म्हटले तर धावताही लेखक आहे. लोकांमध्ये वावरणे मला आवडते, मी माझ्यापरीने माझी समाजनिष्ठा जपणारा आहे. ही समाजनिष्ठा जपताना मी समाजातील प्रश्नांना भिडणारा, त्या प्रश्नांना आपल्या लेखनातून मांडू पाहणारा लेखक आहे. प्रत्येकाचे संघर्षाचे, सामाजिक वर्तनाचे, निषेध-स्वीकाराचे मार्ग विविध असू शकतात. मी माझ्या मार्गाची माझ्यापरीने आखणी करणारा लेखक आहे. त्यामुळे मी समाजातील प्रश्न माझ्या लेखनातून, माझ्या स्वरातून आत्मीयतेने मांडू पाहतो. बोलणे, अभिव्यक्त होणे, लिहिणे हा प्रत्येक संवेदनशील माणसाचा धर्म असतो. माझाही धर्म हाच आहे. मी लिहितो म्हणजे वाचकांची चार घटका करमणूक व्हावी, असा विचार माझ्या मनात कधीही नसतो. केवळ करमणूक हा सच्चा लेखकाचा धर्म नसतो. तर तो अधर्म ठरतो. आणि मी माझ्या लेखनाचा विचार करताना समाजाच्या प्रकृतीचा, संरचनेचा, भवतालाचा आणि समकालीन वास्तवाचा अधिक गंभीरपणे विचार करतो. हा विचार करताना मी इथली परंपरा, धार्मिक संरचना, राजकीय व्यवस्था आणि तळागाळातला सर्वसामान्य माणूस हे आणि इतर घटक माझ्या या चिंतनामागे असतात. या घटकांचा पीळ त्या-त्या अंगाने विचार करता मला अधिक जाणवतो. अस्वस्थ करतो. हे

अस्वस्थ होणं एका सामान्य माणसाचंही असू शकतं; पण सर्जनाच्या पातळीवरील हे अस्वस्थपण अधिक ठळक असू शकतं. या अस्वस्थतेचा विचार करताना इथली धर्मव्यवस्था, धर्मसत्ता माझ्यासमोर येते. धर्माचा इतिहास फार मोठा आहे. मुळात धर्माची निर्मिती कशासाठी झाली? आणि इतिहासात धर्माने काय केले, या प्रश्नांजवळ येऊन मी थबकतो. मुळात सर्वसामान्य माणसाच्या मानसिक गरजेतून त्याच्या कल्याणार्थ धर्माची निर्मिती झाली आहे. प्राचीन काळी धर्म हा सर्वोच्चपदी होता. धर्मसत्ताक राज्ये त्यातूनच म्हणजे धर्माची वेगळी गरज म्हणून निर्माण झाले. पुढे राजसत्तेने धर्मसत्तेचे जोखड झुगारून देत धर्मसत्तेलाच आपल्या अंकित ठेवले. राजा हा सर्वोच्च समजला जाऊ लागला. तोच धर्माचा रक्षणकर्ता म्हणून ओळखला जाऊ लागला. राजसत्तेचा आणि धर्मसत्तेचा संघर्ष किती मूलभूत होता हे ग्रीक किंवा भारतीय इतिहासातून आपल्याला कळून येते. इतिहासाची ही चक्रे आजच्या परिस्थितीत पुन्हा नव्या रूपाने फिरू लागतात तेव्हा सर्वसामान्य माणूस भ्रांतचित्त होतो. पृथ्वीच्या पाठीवर भारतीय संस्कृती ही अतिप्राचीन आहे, असे मानले जाते. आणि त्याची साक्ष म्हणजे याच संस्कृतीत निर्माण झालेली अतिभव्य महाकाव्ये होत. 'रामायण' आणि 'महाभारत' या दोन महाकाव्यांनी आपल्या प्रातिभ उंचीने जागतिक वाङ्मयात सर्वोच्च स्थान मिळवले आहे. प्रचंड प्रतिभाबलाने निर्मिलेल्या या महाकाव्याचा मूलधर्म बाजूला सारून आपण त्यातील समाजदर्शन, व्यक्तिदर्शन, मानवी नातेसंबंध या गोष्टींना बाजूला सारून त्यातील धर्मचर्चा प्रधान मानून त्यांना धर्मग्रंथाचे स्वरूप दिले. या ग्रंथातील धर्मचर्चा हा नेहमीच परिष्कृत भाग राहिलेला आहे. तो त्या ग्रंथाच्या मूळ निर्मितीत कधीच नव्हता. महाभारत हे महाकाव्य तर केवळ काव्य नसून तो भारतीय समाजाचा काव्याच्या आकृतिबंधात सांगितलेला मोठा इतिहास आहे. किंबहुना 'भारतीय इतिहासलेखनाची परंपरा महाभारतापासून सुरू झाली' (मूळ शीर्षक : हा जय नावाचा इतिहास आहे) असे विधान इतिहासचार्य वि. का. राजवाडे 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास' या ग्रंथात करतात, हेही समजून घेणे आवश्यक आहे. आणि या ग्रंथापुढे गटे, होमर, शेक्सपिअर यांचे साहित्यसुद्धा कुठे उभे राहू शकत नाही, असे विधान विंदा करंदीकर एके ठिकाणी करतात; पण आपण हे सगळे विसरून उलट्या अंगाने प्रवास करीत गेलो. हा धर्म पुन्हा

नवी संहिता... नवा आशय...

द आर्ट ऑफ चूझिंग

शीना अयंगार

अनुवाद

सुभाष जोशी



निवडीची कला बाणवा अंगी... मग होईल जीवनाची परिपूर्ती

किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.

अनुवादातून अनुसर्जनाकडे

लीना सोहोनी



दोन भाषांचा संगम घडविणाऱ्या अनुवादाची तंत्रे आणि मंत्रे स्पष्ट करणारा अमूल्य साहित्यिक ऐवज...

किंमत : ३७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

एकदा तपासून पाहणे अधिक अर्थपूर्ण ठरेल; कारण हा धर्म व्यास किंवा वाल्मीकी यांनीही कधी अपेक्षिला नसावा. ही दोन्ही नावे महाकवी म्हणून मान्यता पावलेली आहेत एवढे जरी लक्षात घेतले तरी यामागील भूमिका समजून येईल.

आजचे प्रश्न आणि शासनव्यवस्था : दोष कुणाचा?

आजचा एक ज्वलंत प्रश्न आणखी मला भेडसावीत आहे. तो म्हणजे मराठी भाषेच्या संबंधातला आणि तरुणांच्या एकूणच भवितव्याविषयीचा. आपण मराठीला अभिजात दर्जा मिळावा म्हणून समर्थपणे आग्रही आहोत. तो आपला हक्कही आहे, हे आपण सिद्ध केले आहेच; पण एकीकडे मराठी भाषेच्या अभिजात दर्जासाठी आपण धडपडत असताना मराठी भाषेची, मराठी माध्यमांच्या शाळांची अवस्था काय आहे, असा प्रश्न पडतो. मराठी भाषेसंबंधी जवळजवळ पस्तीस वर्षांपूर्वी बोलताना तात्यासाहेब शिरवाडकर म्हणाले होते-आज मराठी भाषा आपल्या शिरावर राजमुकुट घेऊन आणि अंगावर फाटके वस्त्र पांघरून मंत्रालयाच्या दारात उभी आहे. आजही मराठी मंत्रालयात राजभाषा म्हणून प्रस्थापित झालेली असेल; पण तिला मखरात बंद करून किंवा केवळ कागदावर तिचे गोडवे गाऊन ती समाजात उभी राहू शकेल का? शासन मराठी विषयाच्या संबंधाने आदेशावर आदेश काढत असताना मराठीची गळचेपी कोण करतं, हेही तपासून पाहणं गरजेचं झालं आहे. मराठी माध्यमांच्या शाळा धडाधड बंद पडत आहेत. आजवर जवळजवळ सोळा हजार मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडल्याचा आकडा आहे. एकीकडे असे म्हटले जाते की आजच्या समाजाची मराठी भाषेविषयीची अनास्था वाढीस लागली आहे. हेही समजू शकतो; पण मराठी भाषेसाठी, शाळांसाठी कोणते वेगळे प्रयत्न आपण करतो? मध्यंतरी ऐकीवात आले होते- सरकार या मराठी शाळा खासगी संस्थांना चालवायला देणार आहे. आज शिक्षण व्यवस्थेचं भग्न रूप कुणी उभं केलं असेल तर या खासगीकरणाने. या खासगीकरणाच्या वर्तुळात सर्वसामान्य, गरीब माणूस कुठे आहे? प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे, हे भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वाचे कलम आहे. हे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच असावे हा विचार त्या कलमात अध्याहृत आहे, हे पुन्हा सांगायला नको.

असे असताना हा विसर आपल्याला का पडला? श्री. म. माटेंनी जवळजवळ शंभर वर्षांपूर्वी एक इशारा देऊन ठेवला होता- 'देश म्हणजे देशातील दगडधोंडे नव्हेत, तर देशातील माणसे होत.' आणि या देशातील माणसांचा विसर आपल्याला पडणे यासारखे अक्षम्य असे दुसरे काही नाही. आज राज्यातील प्राथमिक शाळा वाचविणे, त्यासाठी वेगळा कृतिआराखडा निश्चित करणे अधिक महत्त्वाचे आहे. मराठी भाषेचे अध्ययन केवळ प्राथमिक किंवा माध्यमिक-उच्च माध्यमिक स्तरावरच राहू नये, तर मराठी हा विषय पदवी परीक्षेपर्यंत सर्वच शाखांमधून शिकवणे आवश्यक करणे ही शासनाची जबाबदारी आहे. आज मराठी भाषेचे अध्ययन आणि अभ्यासक्रम अतिशय सुमार झालेला आहे आणि याला विद्यापीठीय अभ्यास मंडळे जबाबदार आहेत. सुलभीकरणाच्या प्रयत्नात केवळ वरवरची अशी क्रमिक पुस्तके तयार करून किंवा निवडून आपण मराठीचा उद्धार करतो, अशी धारणा आज झालेली आहे. आणि ती बदलणे गरजेचे आहे. गावखेड्यातील गरिबांच्या मुलांना आपल्या मातृभाषेतून शिक्षण मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. इंग्रजी, हिंदी आणि मराठी हा भाषाभ्यासाचा क्रम बदलून तो मराठी, हिंदी आणि इंग्रजी असा असावा. राजभाषा म्हणून आपण ज्या मराठीचे प्रासंगिक गोडवे गातो, त्या भाषेला अभ्यासक्रमात दुय्यम, तिय्यम स्थान देणे ही आपल्या भाषाविषयक उदासीनतेची साक्ष देणारी गोष्ट आहे. आणि यासाठी केवळ शासनाला जबाबदार धरणे यापलीकडे काहीही सांगता येणार नाही. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी अशी भावना सगळ्या मराठी जनतेची आहे. आणि तिला ज्ञानभाषा करण्यासाठी सर्वप्रथम शासकीय स्तरावरूनच प्रयत्न होणे अत्यावश्यक आहे, असे आग्रही प्रतिपादन या व्यासपीठावरून करणे मला गरजेचे वाटते. मराठी भाषेचे विद्यापीठ रिद्धपूर येथे स्थापन झाले त्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे जाहीर अभिनंदन करणेही आमचे कर्तव्य आहेच.

तरुणाईचा अंत किती पाहणार आहात ?

या अनुषंगाने आणखी एक गंभीर मुद्दा मी पुढे ठेवतो. तो म्हणजे देशातील बेकारीचा. हा राजकीय मुद्दा आहे, असे कृपया कुणी समजू नये. तर तो आजच्या पिढीचा, समाजाचा एक ज्वलंत प्रश्न आहे. हा राजकीय

विषय आहे आणि तो लेखकाने भाषणात वगैरे घेण्याचे कारण नाही, असेही कुणी म्हणू शकेल; पण लेखक हा शब्दांशी झटत असताना तो या शब्दांमागील वेदना याच समाजातून शब्दबद्ध करीत असतो. सामाजिक भान जपणारा, समाजातील प्रश्न समजून घेत त्यावर आपल्या लेखनातून काही एक चिंतन करणारा, राजकीय समकालाचा अन्वय विविध पातळ्यांवर लावू पाहणारा मी एक लेखक आहे, म्हणून या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून मला पुढे जाता येणार नाहीच.

नव्वदनंतर पहिल्या काही दिवसांतच आपण मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. खाउजा हे धोरण स्वीकारले. यातील खासगीकरणाने आपल्या शैक्षणिक जीवनात आमूलाग्र क्रांती केली. प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंतच्या सगळ्या पायऱ्यांवरील शिक्षणात गेली तीस वर्षे आपला समाज अधिक सुधारला, आपली प्रगती झाली या समजात आपण होतो, आहोतही. जे सरकार करू शकत नव्हते ते खासगी शिक्षण संस्थांनी करून दाखविले. बहुतेक स्वायत्त विद्यापीठांनी आपले शैक्षणिक धोरण आखून शिक्षणक्षेत्रात प्रगती केली. आणि हे सुरू असताना सरकारने मात्र आता आपल्याला शिक्षणक्षेत्रात काहीही करायचे नाही, किंबहुना करण्यासारखे काहीही उरले नाही अशा हेतूने या क्षेत्राकडे चक्क पाठ फिरवली. सरकार कालचे असो की आजचे. पक्ष कुठलाही असो; पण आज सरकारी शिक्षणक्षेत्राचे चित्र पाहता प्रचंड निराशा पदरी पडते. प्राथमिक शिक्षणासाठी, कनिष्ठ महाविद्यालयासाठी शिक्षणसेवक म्हणून नवा पायंडा पाडला गेला आणि तीन वर्षे त्या उमेदवाराचे जगणे जणू हातावर आणून पानावर खाणे अशा स्वरूपाचे झाले. जवळजवळ बहुतेक उच्च महाविद्यालयांतील अनेक प्राध्यापकांच्या जागा रिकाम्या आहेत. २०१२ पासून कुठेही प्राध्यापकांच्या नेमणुका झालेल्या नाहीत. ही कशाची उदासीनता आहे? आज याच महाराष्ट्रात हजारो तरुण प्राध्यापक होण्याचे स्वप्न पाहतापाहता पन्नाशीला आलेले आहेत. आपल्या सरकारी उदासीनतेचा हा कळस म्हणावा लागेल. आणि या औदासीन्याला आणखी वेगळी वाळवी लागलेली आहे ती डोनेशनची. आज उच्च महाविद्यालयात प्राध्यापक होण्यासाठी उच्चशिक्षित, संपूर्ण अर्हता असलेल्या उमेदवाराला डोनेशन म्हणून लाखो रुपये द्यावे लागतात. यावर कुणाचा अंकुश आहे? शिक्षणाचा बाजार करणारी मंडळी

शिक्षणव्यवस्थेच्या केंद्रस्थानी बसलेली आहेत. जो डोनेशन देऊ शकतो तो प्राध्यापक होतो आणि ज्यांच्याजवळ पैसा नाही अशी हुशार, प्रतिभासंपन्न तरुण-तरुणी खासगी महाविद्यालयात दहा हजारांवर नोकऱ्या करीत आहेत. हे चित्र कधी बदलणार आहे? आज आपण शिक्षणाच्या गुणवत्तेच्या स्खलनावर चर्चासत्रांतून तावातावाने बोलतो; पण पुढे काय? शासन यावर कोणती उपाययोजना करेल? हा विषय साहित्याचा, कलाकृतीचा शोकात्म विषय आहे. १९५६ साली या विषयावरचे जॉन ओस्बेन या नाटककाराचे Look Back In Anger हे नाटक रंगभूमीवर आले आणि युरोपात सर्वत्र खळबळ उडाली. १९६५ साली वसंत कानेटकरांचे 'अश्रूंची झाली फुले' किंवा १९७६ साली आलेले विजय तेंडुलकरांचे 'पाहिजे जातीचे' हे नाटक किंवा भालचंद्र नेमाडेंची कादंबरी 'चतुष्ट्य' किंवा माझी 'पांढरे हत्ती' ही कादंबरी किंवा अशा स्वरूपाचे मराठीत आलेले लेखन यातून या प्रश्नाची दाहकता वरचे वर मांडली गेली आहे; हा प्रश्न जर निकाली लागला नाही आणि सुशिक्षित तरुण-तरुणी उद्या आत्महत्या करू लागले तर त्याचे खापर कुणाच्या माथ्यावर फोडायचे? आणि ही सुरुवात झालेली आहे. शिक्षण क्षेत्रात पस्तीस वर्षे घालविलेला मी त्यांचा एक प्रतिनिधी म्हणून अतिशय खेदाने ही भीषणता आपल्यासमोर मांडत आहे. सुशिक्षित बेकारांच्या आत्महत्येच्या बातम्या आज मधूनमधून वर्तमानपत्रातून वाचायला मिळतात. फुले, शाहू, आंबेडकर यांचा वैचारिक वारसा लाभलेल्या प्रगत महाराष्ट्रात या अशा बातम्या अभिमानास्पद मानायच्या का? मागील काही वर्षांत महाराष्ट्र प्रांत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसाठी प्रथम क्रमांकावर होता. आजही आहे. आणि पुन्हा सुशिक्षित बेकारांच्या आत्महत्या होणारा एक प्रगत प्रांत म्हणून या प्रांताची ओळख व्हावी असे आपणास वाटते काय? आणि एक लक्षात ठेवा. तरुणांची ही ऊर्जा वाहत्या पाण्यासारखी असते. ती सृजनाची जशी गंगोत्री होऊ शकते तशीच ती प्रलयाचे कारणही होऊ शकते. गुजरातमधील नवनिर्माण चळवळ किंवा जयप्रकाश नारायणांचा संपूर्ण क्रांतीचा नारा हा इतिहास खूप जुना नाही. महाराष्ट्रातली युक्रांद चळवळ किंवा दलित पँथर किंवा अ.भा.वि.प.सारख्या चळवळी या काळाची अपत्ये होत्या. आणि काळ कुठल्याही परिस्थितीत काहीही प्रसवू शकतो. हे विषय मी अत्यंत कळकळीने मांडत आहे; कारण हे आजच्या समाजाचे वास्तव आहे. आणि

या वास्तवाने सामाजिक स्वास्थ्याला वाळवी लागणार असेल तर त्याचा विचार तेवढ्याच गंभीरपणे आपण सगळ्यांनी करणे गरजेचे आहे. १९६४ साली मडगाव येथे झालेल्या पंचेचाळिसाव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून स्व. वि. वा. शिरवाडकर, उपाख्य कवी कुसुमाग्रज यांनी जेरोम के जेरोम या पाश्चात्त्य विचारवंताचे एक वचन उद्धृत केले होते, ते वचन असे आहे- 'सरकार आणि हवा या दोन्हीसंबंधी सहसा कोणीही चांगले बोलत नाही.' आजच्या मितीस दुर्दैवाने हे वाक्य खरे ठरू नये, हीच अपेक्षा आहे.

पूज्य साने गुरुजी : तेथे कर माझे जुळती

या मुद्द्यांचा विचार करताना मी पुन्हा पूज्य साने गुरुजींकडे येतो. कोकणात जन्मलेले साने गुरुजी, प्रताप शेट यांच्या आग्रहामुळे अमळनेर या भूमीत येतात आणि आपली हयात इथे घालवतात. एक लेखक म्हणून, कवी म्हणून, स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक म्हणून त्यांचे काम खूप महत्त्वाचे आहे. पंढरपूरचे देवालय दलितांना खुले व्हावे म्हणून त्यांनी केलेला सत्याग्रह हा नाशिकच्या काळाराम सत्याग्रहाएवढाच महत्त्वाचा होता. या लढ्यात त्यांनी बडव्यांची मध्यस्थी नको म्हणून दिलेला लढा आजच्यासाठीही तेवढाच बोलका आणि अनुकरणीय आहे; पण मी त्यापेक्षा गुरुजींच्या वेगळ्या, पण सर्वश्रुत पैलूकडे वळणार आहे. आणि तो पैलू म्हणजे त्यांच्यातील प्रतिभावंत. त्यांच्या काळात एक रडका, भावुक, बाळबोध लेखक म्हणून (आचार्य अत्रे मात्र अपवाद) आधुनिक कलावादी लेखकांनी त्यांची बोळवण करून त्यांना मुख्य साहित्य प्रवाहापासून बाजूला सरले होते; कारण त्यांनी गुलछबू प्रेमाच्या गोष्टी लिहिल्या नव्हत्या, त्यांनी श्यामचतुष्ट्य, अनुवाद, कविता इत्यादी जवळजवळ १११ पुस्तकांचे लेखन केले आहे. १९३३ साली लिहिलेल्या 'आस्तिक' या कादंबरीत तक्षक नागाला मानवी रूपात दाखविण्याचा जो दूरदर्शीपणा आणि जी प्रातिभ प्रगल्भता त्यांनी दाखविली ती त्यानंतरच्या पन्नास वर्षांतसुद्धा मराठी कादंबरीकारांना जमली नाही, हे समजून घेतले म्हणजे त्यांच्या प्रतिभेचा आवाका आपल्या लक्षात येईल, त्यातही त्यांच्या बालसाहित्याच्या पुस्तकांना अधिक महत्त्व आहे; कारण त्या काळात बालकांच्या मानसिकतेचा विचार करून असे लेखन करणारे लेखक म्हणून साने

गुरुजींना एकमेव श्रेय द्यावे लागते. साने गुरुजी हे केवळ मराठीतीलच नव्हे तर भारतीय पातळीवरील लेखक ठरतात. त्यांनी हेन्री थॉमस या अमेरिकन लेखकाच्या The Story of the Human Race या पुस्तकाचा मराठीत 'मानवजातीची कहाणी' या नावाने केलेला अनुवाद किंवा 'भारतीय संस्कृती' किंवा 'सुंदर पत्रे'या लेखनाचा विचार करता माझ्या या विधानाला अधिक पुष्टी मिळते. रवीन्द्रनाथ टागोर यांनी आपली पुतणी इंदिरादेवी यांना लिहिलेली पत्रे आणि साने गुरुजींनी आपली पुतणी सुधास लिहिलेली पत्रे हा अनुबंध भारतीय सांस्कृतिकदृष्ट्या मला महत्त्वाचा वाटतो. 'खरा तो एकचि धर्म। जगाला प्रेम अर्पावे' सारखा माणुसकीचा संदेश किंवा 'बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो' सारखी राष्ट्रभावना काय- कवितेच्या माध्यमातून साने गुरुजींनी सतत विचार केला तो मानुषतेचा, राष्ट्रभावनेचा. त्यांच्या पिढीतील ते काळाच्या पुढे जाणारे लेखक-कवी- चिंतक होते. साने गुरुजींच्या लेखनाचे हे मोल नव्याने भालचंद्र नेमाडे यांनी पटवून दिले, याबद्दल त्यांचे जाहीर आभार मानायला हवेच.

साने गुरुजींनी आपली संपूर्ण हयात समाजसुधारणा, लेखन, वाचन, मनन-चिंतन आणि पत्रकारिता यात घालवली. शेवटीशेवटी म्हणजे १९४८ साली त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. १५ ऑगस्ट, १९४८ रोजी 'साधना' चा पहिला अंक प्रकाशित झाला होता. हा मुहूर्त होता स्वातंत्र्याचा पहिला वर्धापन दिन. 'वैरभाव आणि विषमता नष्ट करण्याची थोर 'साधना' आपणास करावयाची आहे. हे 'साधना' साप्ताहिक या ध्येयाने जन्मत आहे,' हे 'साधना'चे घोषवाक्य होते. आणि ११ जून, १९५० रोजी साने गुरुजींचा मृत्यू झाला. तो कसा झाला हे आपणा सगळ्यांना ठाऊक आहे. केवळ वयाच्या पन्नासाव्या वर्षी एवढी साहित्यसंपदा मागे ठेवून साने गुरुजी आत्मनाशाचा मार्ग का स्वीकारतात? प्रत्येक संवेदशील कलावंताच्या मनात एक अमूर्त स्वप्नवाद, युटोपिया असतो. त्याला सत्यात उतरविण्यासाठी तो कलावंत धडपडत असतो. आणि जेव्हा भवतालाच्या कराल वास्तवात हा स्वप्नवाद भकास वाटेवर एकाकीपणे हिंडताना दिसतो तेव्हा आत्मनाशापलीकडे अशा कलावंताजवळ काहीही उरत नाही. तत्कालीन जनता पक्षाची शकले होत असताना अशीच दुखरी भावना जयप्रकाश नारायणांनी 'माझा बाग उजाड झाला' या शब्दांत व्यक्त केली होती. 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी'

अशा उदात्त शब्दांत आचार्य अत्रे यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली होती, सामाजिक, राष्ट्रीयदृष्ट्या, मानवतेच्या दृष्टीने आपण उराशी जपलेला स्वप्नवाद अवघ्या तीन वर्षांतच भंगून गेला, या भावनेने हताश होऊन आत्मनाशाचा मार्ग अनुसरणारे एकमेव भारतीय व्यक्तिमत्त्व म्हणून आपण साने गुरुजींच्या एकूण जीवनाकडे पाहू लागलो तेव्हा एक प्रश्न माझ्यासारख्याला पुन्हा अस्वस्थ करतो, ज्या स्वातंत्र्यासाठी आपण इंग्रजांशी दीडशे वर्षे संघर्ष केला आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अवघ्या तीन वर्षांत आपला भ्रमनिरास व्हावा, हा आपला इतिहास आहे का? आणि आज साने गुरुजी असते तर? हा प्रश्न मनाला पुन्हापुन्हा ढुशा देत असतोच असतो.

साहित्यातील रूपकात्मता आणि मराठी लेखक

आमची पिढी नवसाहित्यावर किंवा स्वातंत्र्योत्तर साहित्यावर पोसली आहे; पण नवसाहित्याने गाजवलेला सौंदर्यवाद किंवा त्याच्या आधीच्या काळातील रसचर्चा आमच्यासाठी काहीही उपयोगाची नव्हती. 'रसचर्चेची अडगळ' म्हणून गंगाधर गाडगीळांनी या रसव्यवस्थेविरुद्ध झेंडा हाती घेतला होता, तसाच 'सौंदर्यवाद आणि रूपवादाविषयी'चा झेंडा साठोत्तरी काळात लिहू लागलेल्या काही प्रतिभावंतांनी आपल्या हाती घेतला होता. या काळात जन्मलेल्या वास्तववादी साहित्याने आमच्या जगण्याला नवा आकार दिला. साधारणत:, पंचेचाळीस ते साठ हे दीड दशक कथेचे होते, तर साठोत्तरी काळ हा कादंबरीचा होता, असे हमखास म्हणावे लागते. काही अपवादभूत महत्त्वाचे कथाकार सोडले तर या काळात कादंबरीकारांची एक मोठी मांदियाळी दिसून येते. काही लेखक कथेकडून कादंबरीकडे वळले तर काही लेखक कथा आणि कादंबरी असा समांतर प्रवास करताना दिसतात. साहित्य अकादमीच्या पुरस्कारांच्या यादीत मराठी कादंबरीची संख्या सर्वाधिक आहे. मराठीतील चार ज्ञानपीठ पुरस्कारांपैकी दोन ज्ञानपीठ पुरस्कार कादंबरीकारांना मिळालेले आहेत. तीन सरस्वती पुरस्कारांत कादंबरीसाठीही (सनातन : शरणकुमार लिंबाळे) एक पुरस्कार आहे. भारतीय भाषांमध्ये मराठी कादंबरीला मानाचे आणि नामाचेही स्थान मिळाले आहे. अनेक लेखक विविध भारतीय भाषांमध्ये गेलेले आहेत. त्यात विश्वास पाटील आणि शरणकुमार लिंबाळे अग्रणी आहेत. आता मराठी सद्य:कालीन

नवी संहिता... नवा आशय...

महारुद्र

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधला मराठमोळा झंझावात!

जी. बी. देशमुख



देशाच्या मातीत फुटबॉलचा जल्लोष पेरणाऱ्या एका महाराष्ट्रीयन खेळाडूची अंतर्मुख करणारी कथा

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

सोलापूर मार्शल लॉ १९३०

अनिरुद्ध बिडवे



देश स्वातंत्र्यापूर्वीच सोलापूर स्वतंत्र झालं होतं, पण इतिहासाच्या पानांवर ही घटना दुर्लक्षित राहिली. या अद्‌भुत घटनेचा इतिहास जिवंत करणारं पुस्तक

किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

समीक्षेच्या फुटपट्ट्या आणि हे मराठी लेखक यांच्या संदर्भात काही बोलले पाहिजे.

मराठी कादंबरीविषयी

मराठी कादंबरीच्या संदर्भात दोन निबंध महत्त्वाचे आहेत. पहिला निबंध इतिहासकार वि. का. राजवाडे यांचा 'कादंबरी' याच नावाने प्रसिद्ध आहे, तर दुसरा निबंध भालचंद्र नेमाडे यांचा '१९५० ते १९७५ ह्या कालखंडातील मराठी कादंबरी: प्रेरणा व स्वरूप' या नावाने प्रसिद्ध असलेला. दोन्ही निबंधांत कादंबरी या प्रकारावर विस्तृत आणि मूलभूत चर्चा केली आहे. या निबंधांच्या अनुषंगाने राजवाडेंसमोर हरिभाऊ आणि हरिभाऊपूर्व कादंबरी होती, तर नेमाडेंसमोर प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरी होती. जागतिक कादंबरीच्या तुलनेत मराठी कादंबरीची चर्चा करीत आता 'शेवटी तो हरि जाणे' अशा आशयाचे विधान करून मराठी कादंबरीला राजवाडे हरिभाऊपर्यंत आणून ठेवतात. कादंबरी- संबंधीची ही चर्चा करताना राजवाडे जाज्वल्य मनोवृत्ती, श्रेष्ठ विद्या, विस्तृत वाचन, मोठा प्रवास, तीक्ष्ण निरीक्षण, कडक परीक्षण, थोर औदार्य, गाढ सहानुभूती आणि नाटकी लेखणी हे कादंबरीकारासाठी आवश्यक असणारे गुण सांगतात, तर भालचंद्र नेमाडे कल्पित, ऐतिहासिक- पौराणिक आणि वास्तववादी अशा तीन प्रवाहांना समोर ठेवून प्रतिकृतीप्रधान-रीतिप्रधान आणि कृतिप्रधान अशाप्रकारे संपूर्ण मराठी कादंबरी वाङ्मयाची पुन:तपासणी करतात. नेमाडे आपल्या या निबंधातून एक विशिष्ट पोज घेऊन आपल्या प्रकृतीच्या कादंबऱ्यांना उचलून धरतात आणि काही महत्त्वाच्या कादंबरीकारांची दखल घेताना आपल्या आवडीनिवडीला प्राधान्य देतात. उदाहरणच द्यायचे झाले तर अरुण साधूंचा उल्लेख ते या निबंधात केवळ दोन ओळींत करतात. तर शरच्चंद्र मुक्तिबोध यांचा साधा उल्लेखही कुठे येत नाही. आणखी एक गंमत अशी की त्यांच्यामते 'सावित्री' (पु.शि.रेगे), 'अंधारवाटा' (सुभाष भेंडे) या कादंबऱ्या लघुकथा वाटतात तर श्री. ना. पेंडसे यांच्या 'गारंबीचा बापू', 'रथचक्र'या दीर्घकथा वाटतात. मग अर्नेस्ट हेमिंग्वेच्या 'Mr. Old Manthe Sea' या कादंबरीला आपण कुठल्या आकृतिबंधात टाकायचे? 'कोसला'ला तरी कुठल्या आकृतिबंधात टाकायचे? रा. रा. नेमाडे यांचे या

संदर्भातील प्रस्तुत निबंधातील एक विधान समोर ठेवून त्यांचा हा विचार समजून घेता येईल का ते पाहता येईल. ते म्हणतात-लघुकादंबरीत लघुकथा आणि दीर्घकथा या दोन्हीपेक्षा अवकाशाचा विस्तार तर असतोच; पण आशयसूत्राचे पदर वाढतात. त्यामुळे स्थळकाळाच्या मिती वाढतात. कादंबरीत ह्या प्रमाणात आशयसूत्रे व त्याचे पदर अनेक असतात, ह्यामुळे अवकाश प्रदीर्घ व विस्तृत होतो. लघुकथा व दीर्घकथा यांच्या उलट कादंबरीवर लांबीच्या किमान मर्यादा असतात. व्यामिश्र आशयसूत्रांमुळे हा अवकाश स्थळ व काळ यांना व्यापून ह्यापलीकडे वास्तव सुचवीत असतो. कादंबरीच्या ह्या कालातीत सूचक- शक्तीमुळे तिचा अवकाश कितीही मोठा असू शकतो. (संदर्भ : निवडक मराठी समीक्षा : पृष्ठ क्र.२८८ : साहित्य अकादमी प्रकाशन) वरील परिच्छेदातील 'लघुकथा व दीर्घकथा यांच्या उलट कादंबरीवर लांबीच्या किमान मर्यादा असतात.' हे वाक्य मागील-पुढील संदर्भ लक्षात घेऊनही माझ्यासारख्या पामराला कळले नाही. त्यांना असतात म्हणायचे आहे की नसतात म्हणायचे आहे? थोडक्यात चकवे निर्माण करीत चटपटीतपणे विधाने करणे हे त्यांचे खास वैशिष्ट्य आहे. परंपरेच्या अंगाने भारतीय कादंबरी जाताना तिचा पैस तपासून पाहणे हेही अधिक महत्त्वाचे ठरते, परंपरेच्या अंगाने याचा अर्थ इथल्या सांस्कृतिक इतिहासाच्या, मिथकांच्या, पुराणकथांच्या अंगाने कादंबरी या प्रकाराचा विचार करायचा तर तो कसा करता येईल? आणि आपण तो कसा केलेला आहे किंवा करीत आहोत? किंवा करीतच नाही? असाही विचार समजून घेणे महत्त्वाचे ठरावे.

पुराणकथांना किंवा ऐतिहासिक कथांना आपण घटित कथांच्या अंगाने समजून घेतो, त्यातल्या काही कथा नक्कीच घटित कथा आहेत. उदाहरणार्थ, रामायण किंवा महाभारत या कथांना आपण घटित कथा मानतो; पण या घटित कथांचा प्रवाह आपल्यापर्यंत मौखिक परंपरेतून चालत आलेला आहे. त्यामुळे त्यातील घटित संदर्भ पुन्हा तपासून पाहावे लागतात. मुळात मेख अशी आहे की या कथा आपल्या श्रद्धेचा, भक्तीचा विषय झालेल्या असतात. त्यामुळे या कथांचे पावित्र्य भंगू नये हा अलिखित संकेत ठरून गेलेला असतो आणि जेव्हा ललितलेखक किंवा कादंबरीकार या अशा कथांचा आपल्या लेखनासाठी विचार करू लागतो तेव्हा त्याच्यासमोर पहिला प्रश्न पडतो तो पावित्र्यभंजनाच्या भीतीचा. आणि हा प्रश्न आज तर अधिकच

नाजूक झालेला आहे, अशा वेळी मग रूपकाच्या, प्रतीकाच्या अंगाने या कथांचा विचार होणे, किंवा समकालीन प्रश्नांचे प्रतिबिंब त्यात शोधून ती कथा नव्याने उद्धृत करणे त्या-त्या लेखकाच्या प्रतिभेला विलक्षण आव्हान देणारे ठरते. समकालीन समस्येचे प्रतिबिंब मिथकीय कथांमधून शोधण्याची परंपरा मराठीत कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांच्या 'कीचक वध' या नाटकापासून सुरू झाली; पण नंतर ती पूर्णत: क्षीण होऊन पुन्हा नाहीशी झाली. नंतर ती तेंडुलकरांच्या 'घाशीराम कोतवाल' या नाटकाने पुन्हा सिद्ध केली; पण पुन्हा तेच. 'घाशीराम' वर उठलेले वादळ आपण विसरलेलो नाहीच. किंवा हिंदीतील धर्मवीर भारतींचे 'अन्धा युग.' असे प्रयोग मराठी कादंबरीच्या क्षेत्रात का झाले नाहीत, हा प्रश्न मला पडतो.

या संदर्भात मला काही भारतीय भाषांमधील कादंबऱ्या आठवतात. कन्नड कादंबरीकार डॉ. एस. एल. भैरप्पा यांची 'पर्व' ही भारतीय साहित्यातली एक अत्युच्च कादंबरी आहे. आजवर तिच्या कन्नड भाषेत शंभर आवृत्त्या निघालेल्या आहेत. या कादंबरीने महाभारताचा लावलेला नवा अन्वयार्थ खूप विलक्षण आहे. महाभारताच्या मूळ ढाच्याला कुठेही धक्का न लावता एक मोठा आधुनिक आशय ते त्यातून व्यक्त करतात, देवत्वाला माणूसपण बहाल करून त्यांच्या व्यक्तित्वातील नवा अर्थ ते प्रतीत करतात. हिंदीमध्ये निरंजन जमींदार 'और क्षिप्रा बहती रही' मधून पेशवाईतील बारभाई कारस्थान वेगळ्या शैलीत मांडतात. अगदी अलीकडे म्हणता येईल अशी हिंदीत आलेली कादंबरी म्हणजे कमलेश्वर यांची 'कितने पाकिस्तान' वेगळ्या रूपबंधात आपल्यासमोर येते. मराठीतली ऐतिहासिक, पौराणिक कादंबरी पावित्र्यभंजनाच्या सुप्त भीतीपोटी आक्रसून गेलेली असल्यामुळे आपण मग तीच ती मूळ कथा वारंवार सांगू लागतो. अर्थात अशा कथांतून त्या-त्या कथानायकांचे उदात्त व्यक्तिमत्त्वच आपण पुन्हा-पुन्हा चितारत असतो. अर्थात असे प्रयोग मराठीत झालेलेच नाहीत असेही नाही. शैला बेल्ले यांची 'दक्षिणायन' ही कादंबरी (ग्रंथाली प्रकाशन) रामाच्या दक्षिण प्रवासावर वेगळा प्रकाश टाकणारी अशी आहे. राम हा कैकेयीच्या हट्टामुळे दक्षिणेत जात नाही, तर आर्यसंस्कृतीच्या विस्तारासाठी आणि प्रभुत्वासाठी दक्षिणेत जातो आणि तिथे राजकीय वर्चस्व, प्रभुत्व प्रस्थापित करतो. रवींद्र शोभणे या लेखकाची 'उत्तरायण' ही कादंबरी महाभारताचा नव्याने अन्वय लावत

भव्य- दिव्य म्हणविणाऱ्या व्यक्तिरेखांना मानवीय पातळीवर आणून तर्कशास्त्रीय, वैज्ञानिक दृष्टिकोनातून नवा अर्थ लावू पाहते; पण काही लेखकांच्या लेखनाकडे आपण शपथपूर्वक दुर्लक्षच करायचे असे मराठीतील काही दिव्य-भव्य प्रतिभावंतांनी, समीक्षकांनी ठरविले असेल तर त्याला काहीच उपाय असू शकत नाही. हे मराठी समीक्षेचे आणि अभिरुचीचे कोतेपण सिद्ध करणारी घटना म्हणून मी तिला दुर्लक्षित करतो. या ठिकाणी मला पाश्चात्त्य विचारवंत नित्शे याची आठवण होते. नित्शे असे म्हणतो- कथालेखकाने किंवा सर्जनशील कलावंताने इतिहास घडविणाऱ्यांच्या बाजूने उभे राहण्यापेक्षा इतिहास भोगणाऱ्यांच्या बाजूने उभे राहणे महत्त्वाचे ठरते. याचा अर्थ इतिहास घडत असताना सामान्य माणसे कशी चिरडली जातात, ते कसे अस्तित्वहीन होतात, हे शोधणे महत्त्वाचे असते.

आधुनिक मराठी साहित्याच्या पूर्व पर्वावर साहित्याच्या केंद्रस्थानी सामान्य माणूस असावा ही जाणीव आम्हाला पहिल्यांदा महात्मा जोतिराव फुले यांनी करून दिली. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांच्या, बलुतेदारांच्या, कष्टकऱ्यांच्या जातिव्यवस्थेच्या संदर्भात केलेले लेखन खूपच मूलभूत असे आहे. या लेखनासोबतच त्यांनी आपल्या समाजात रूढ असलेल्या मिथकांचा, पुराणकथांचा लावलेला अन्वयार्थ अतिशय महत्त्वाचा आहे. 'गुलामगिरी' या त्यांच्या पुस्तकातील हे सगळे विवेचन मुळातून वाचण्यासारखे आहे. या विवेचनाच्या पुष्ट्यर्थ मी दोन महत्त्वाच्या ग्रंथांचा उल्लेख आग्रहाने करेन. पहिले पुस्तक पंडित राहुल सांस्कृत्यायन यांचे 'व्होल्गा ते गंगा' आणि दुसरे पुस्तक म्हणजे डॉ. रावसाहेब कसबे यांचे 'मानव आणि धर्मचिंतन.' या दोन्ही ग्रंथांतून आपल्या तथाकथित उज्ज्वल परंपरेची जी चिकित्सा केली आहे ती मुळातून वाचण्यासारखी आहे. आज सबंध मराठी कृषिप्रधान, ग्रामीण साहित्याची उभारणी जशी महात्मा फुलेंच्या या वैचारिक अधिष्ठानावर झालेली आहे, तशीच उभारणी मराठीतील पौराणिक किंवा ऐतिहासिक साहित्याची झाली असती तर आज मराठीतील या प्रकृतीच्या लेखनाची स्थितिगती वेगळी राहिली असती.

कथात्म साहित्यात नॉस्टेल्जिया असावा की असू नये हाही वाद असतो. नॉस्टेल्जियाचा अर्थ आपण साधारणत: पूर्वस्मृतिरंजन असा घेतो. जगातील सगळेच साहित्य नॉस्टेल्जिया स्वरूपाचे आहे; पण या लेखनातून

निघणारा ध्वन्यर्थ हा जर समकालीन समाजवास्तवाशी नाते सांगणारा असेल तर तो निश्चितच अर्थघन ठरतो. उदाहरणच द्यायचे झाले तर आजचे बहुतेक ललितलेखन या स्वरूपाचे आहे हेही नाकारता येत नाही. थोडक्यात, भूतकाळाचे उदात्तीकरण असे म्हणता येईल; पण यातही काही कलाकृती या समकालाशी, समकालीन वास्तवाशी घट्ट नाते सांगणाऱ्या ठरतात, रणजित देसाई यांची 'स्वामी'वाचताना 'जुनी मंडळी सत्ता सोडत नाही आणि नव्यांना सत्ता चालवू देत नाही' हा आशय स्वातंत्र्यानंतरच्या आपल्या राजकारणाचे चित्र प्रतिबिंबित करणारा आहे, हे नाकारता येत नाही, विश्वास पाटलांची 'पानिपत' समूहनिष्ठ राजकीय स्वाभिमानाचे चित्र आपल्यासमोर उभे करते. वसंत कानेटकरांचे 'रायगडाला जेव्हा जाग येते' मधून पिता-पुत्राच्या संघर्षाचे कालातीत चित्र उभे राहते; पण आपण नॉस्टेल्जिया या संकल्पनेचा अर्थ त्या-त्या लेखकाच्या भूतपूर्व आयुष्याशी निगडित केला तर हा उलगडा अधिक चांगल्या प्रमाणात होईल. उदाहरणार्थ- मराठीतील दलित साहित्यात आलेले बहुतेक कथात्म लेखन हे साठोत्तरी काळात झालेले आहे आणि त्यातील वर्ण्य व घटित काळ हा बघितला तर तो स्वातंत्र्यपूर्व आहे; पण हे भीषण वास्तव कालातीत होते, ते त्या क्षणापर्यंत अस्पर्शित असे होते. आणि आपल्या दिव्य म्हणविणाऱ्या सांस्कृतिक इतिहासाच्या पटावर एक मोठी चपराक होती. म्हणून हे पर्व साहित्याच्या इतिहासात अधिक महत्त्वपूर्ण म्हणून गणले जाणारे ठरले. आणखी एक-दोन उदाहरणे देऊन या मुद्द्याचा परामर्श घेता येईल. 'बनगरवाडी', 'गारंबीचा बापू', 'रथचक्र' इत्यादी कलाकृतींचा लिखित काळ आणि घटित काळ यातही असेच अंतर आहे; पण यातून ध्वनित होणारा आशय हा सार्वकालिक असा आहे. मराठीत सशक्त म्हणून उल्लेख करता येईल आणि तरीही दुर्लक्षित राहिलेली एक कादंबरी म्हणून शंकर पाटलांच्या 'टारफुला' या कादंबरीचा उल्लेख करता येईल. बदलत्या सत्ताचक्राचे राजकीय रूपक म्हणून ही कादंबरी महत्त्वपूर्ण अशी आहे. याच आशयाची पण मोठे सन्मान पदरात पडलेली व्यंकटेश माडगूळकरांची 'सत्तांतर' ही कादंबरी विचारात घेता येईल. मराठीत आत्मचरित्रात्मक कादंबरीचीही एक शाखा अस्तित्वात आलेली आहे. हा प्रयोग आनंद यादवांनी 'झोंबी'च्या निमित्ताने केला. अर्थात याआधीच्या कादंबऱ्यांचा विचार करता चरित्रात्मक कादंबरी नव्हती, असे म्हणता येणार

नवी संहिता... नवा आशय...

दि न्यू बीजेपी

नलिन मेहता

अनुवाद

सुरेश देशपांडे



देशातील सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयास आलेल्या भाजपच्या जडणघडणीची सांगोपांग अभ्यासपूर्ण मांडणी

किंमत : ९९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

मुंबई आफ्टर अयोध्या

एक बदलते शहर

जीतेंद्र दीक्षित

अनुवाद

वर्षा वेलणकर



अयोध्येतील वादंग ते माफियाराजचा विळखा, मुंबईच्या स्थित्यंतराची पाळंमुळं स्पष्ट करणारा अनोखा दस्तऐवज

किंमत : ५२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नाहीच. फक्त त्यातील नायक लेखकाच्या नावाने रेखाटलेले नसायचे एवढेच. हा प्रयोग यादवांनी मुद्दाम केला. आणि तो यशस्वीही झाला; पण पुढे या चतुष्ट्यात त्यांनीच बदल करून 'आत्मचरित्र' असे संबोधले. यादवांच्या या लेखनावर अनेकांनी भरपूर तोंडसुख घेतले; पण मराठीत तेव्हा आणि आता तर भरपूर प्रमाणात छुप्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांचा घाऊक माल अस्तित्वात आलेला आहे. 'आपलंच जगणं साहित्यात मांडा' असा आदेश एखाद्या त्यांच्या प्रेषिताने, प्रतिभावंताने दिल्यानंतर हे लेखन घाऊक स्वरूपात होणार नाही तर काय? विजय तेंडुलकर या अशा छुप्या आत्मचरित्रात्मक लेखनाच्या प्रखर विरोधात होते. आणि त्यांचा या संदर्भातला विरोध समजून घेता तो योग्यच होता असे म्हणावे लागते; कारण आत्मचरित्रात्मक लेखनात लेखक काही काळातच संपतो. मराठीतील दलित साहित्याचे उदाहरण यासाठी अतिशय बोलके आहे. आपल्या आत्मचरित्रवजा आशयद्रव्याला आपल्या लेखनात फारसे महत्त्व न देताही आपली वाङ्मयीन कारकीर्द लखलखीत ठेवणारा एक महत्त्वाचा कादंबरीकार म्हणून अरुण साधू यांचे उदाहरण अधिक सार्थपणे घेता येईल. त्यांच्या गाजलेल्या सर्वच कादंबऱ्यांचा इथे उल्लेख करणे शक्य होणार नाही; पण त्या सगळ्या कादंबऱ्या या अर्थाने तटस्थ वर्तमान रेखाटणाऱ्या म्हणून मला महत्त्वाच्या वाटतात. त्यांची 'मुखवटा' ही कादंबरीही त्याला अपवाद नाही. 'शोधयात्रा' ही मराठी साहित्यात एक महत्त्वाची कादंबरी म्हणून अधोरेखित करता येईल.

नागपूर येथे भरलेल्या ८०व्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना त्यांनी अलीकडच्या साहित्यातील प्रवृत्तीविषयी मांडलेले मुद्दे आज अधिक बोलके वाटतात. 'आजकाल स्वत:च्या लेखनाचे समर्थन करण्यासाठी आणि त्याच्या उच्च दर्जाची टिमकी मिरवण्यासाठी स्वत:च समीक्षक आणि टीकाकार बनण्याची संशयास्पद चाल काही मराठी साहित्यिकात पडली आहे की काय असे कधी-कधी वाटते. मराठी समाजामध्ये इतर क्षेत्रांत आत्मविश्वासाचा जो अभाव आढळतो त्याचेच हे साहित्यक्षेत्रात पडलेले प्रतिबिंब नाही ना, असाही प्रश्न पडतो. विचारांचे समर्थन करणे, लेखनाचा प्रसार करणे ही गोष्ट समजू शकतो; पण लेखकाने स्वत:च समीक्षक बनून मापदंड तयार करणे आणि स्वत:च्या लेखनावर ए ग्रेडचा शिक्का मारून घेणे हे स्वत:च्या प्रतिभेवर विश्वास नसल्याचे लक्षण आहे.

आत्मविश्वास नसलेले विद्यार्थी परीक्षेत गुण वाढवून घेण्यासाठी खटपटी-लटपटी करतात तसे हे वाटते.' अरुण साधू यांचे हे चिंतन फार महत्त्वाचे आणि अंतर्मुख करणारे असे आहे. याच संदर्भात एक वस्तुस्थिती आज पुन्हा नमूद करणे महत्त्वाचे वाटते. 'सत्यकथा' नावाचे मासिक आणि मौज नावाचे प्रकाशन मराठी साहित्यातील जाणकारांना ठाऊक आहे. 'सत्यकथा' मासिक १९८२ साली बंद पडले; पण 'सत्यकथे'त आपले साहित्य छापून आले तर आपला भाग्योदय झाला; आपण मोठ्या साहित्यिकांच्या मांदियाळीत जाऊन बसलो अशी धारणा त्या काळी सर्वसामान्य लिहित्या लेखक-कवींमध्ये होती. काही प्रमाणात ते खरेही होते. 'सत्यकथे'ने अनेक चांगले कसदार लेखक दिलेत; पण या मांदियाळीत प्रवेश करणे महाकठीण होते. अनेक लेखक वर्षोन् वर्षे खटाववाडीत चकरा मारीत होते. त्याकाळी काही बंडखोर लेखकांनी 'सत्यकथे'च्या या मांदियाळीवर कंपूशाहीचा उघडउघड आरोप करीत हल्ला चढविला होता, त्यात काहीसा जातीय अभिनिवेशाही होता. पुढे या हल्ला करणाऱ्या मंडळींनी आपली वेगळी मांदियाळी उभी केली आणि या कंपूशाहीचा अधिक प्रखर अनुभव मराठी साहित्यविश्वाला आज नव्याने येत आहे. आज मराठी साहित्य या कंपूशाहीच्या विळख्यात अडकलेले आहे हे नाकारता येत नाही. हुकूमशाही विरुद्ध एल्गार पुकारणारा क्रांतिकारक सत्ता हस्तगत करताच पुन्हा जनतेला हुकूमशाहीचा प्रत्यय देतो, हा राज्यशास्त्रातील एक सिद्धान्त आहे, त्याचा अनुभव आम्हाला आलेला आहे. आणि हा अनुभव साहित्यविश्वातील प्रखर जातीय अभिनिवेशातून येतो ते अधिक उद्वेगजनक आहे.

साहित्य : वास्तव आणि युटोपिया

साहित्याने काळासोबत चालावे असे म्हटले जाते. अर्थात यात दोन प्रकार संभवतात. पहिला म्हणजे अगदी समकालीन, वर्तमानकालीन समाजवास्तव रेखाटणारे साहित्य आणि दुसरा प्रकार म्हणजे बदलत्या काळाचा, वर्तमानाचा विचार न करता मानवी नात्यातील सनातन मूल्ये आपल्या प्रकृतीने मांडणारे लेखन. अर्थात समकालाचे, वर्तमानाचे साहित्यात चित्रण करताना मानवी नात्यातील सनातन मूल्ये येत नाहीत, असेही कुणी समजू नये; पण काही लेखक समाजातल्या बदलांकडे, परिवर्तनांकडे, वृत्यंतरांकडे-स्थित्यंतरांकडे

पूर्णतः पाठ फिरवून लेखन करीत असतात. अर्थात अशा लेखकांचे लेखन कमअस्सल असते असेही मानता येणार नाही. उदाहरणच द्यायचे झाले तर मराठी कथेचा मानबिंदू समजले जाणारे जी. ए. कुलकर्णी, चिं. त्र्यं. खानोलकर, ग्रेस ही मंडळी या दुसऱ्या प्रकारच्या लेखन करणाऱ्या मंडळीत येतात. समाजात बऱ्या-वाईट घटना घडताना या लेखकांनी आपल्या डोळ्यांवर जणू कातडे ओढलेले असते. ते स्वतः संवेदनशील असतानासुद्धा त्यांच्या संवेदना समाजातील कुठल्याच घटनेने जाग्या होत नाहीत. त्यांचा विश्वास या अशा वास्तव जगातील घटनांपेक्षा आपल्या आंतरिक बळावर अधिक असतो. दैवावर, नशिबावर, नियतीवर त्यांची भिस्त अधिक असते. आपण या प्रचंड, महाकाय शक्तीच्या हातातील बाहुले आहोत आणि त्या शक्तीच्या बळावर आपण खेळवले जातो अशी या प्रतिभावंतांची धारणा असते. त्यामुळे ते या असल्या स्थितिशील जीवनानुभवाच्या चित्रणात रंगून जातात. त्यांच्या लौकिक जगण्याला या असल्या व्यावहारिक जगातील घटनांनी काहीही इजा होत नाही, असे मानावे लागते. दुष्काळ, अवर्षण, अतिवर्षण, युद्ध, महामारी या अशा वर्तमानकालीन घटनांशी त्यांना काहीही देणे-घेणे नसते. त्यामुळे हे लेखक जनमानसात आदरणीय, लोकप्रिय असले तरी ते आपण फार फार तर मखरात, देव्हाऱ्यात बसवून ठेवतो. त्यांचा चाहता वर्ग वेगळा असतो. कदाचित त्यांच्या शब्दसामर्थ्याने, शब्दप्रभुत्वामुळे ते वाचकांवर गारूड करतात. उदा. ग्रेसची कविता आपल्याला फारशी कळलेच, हे सांगता येत नाही, उदाहरणच घ्यायचे झाले तर पुढील कवितेचे घेता येईल-

भूलभिंगरी नदी किनारी उत्तररात्री मला दिसे
जळात अपुले पातळ सोडून वाऱ्याला ती गाव पुसे

आता या कवितेतून अर्थ काढताना भल्याभल्यांनाच चक्रावल्यासारखे वाटते; पण अर्थ कळत नाही. तरी ती कविता आपल्या नजाकतीने, प्रभावाने आपल्याला खेचून घेते. ही मंडळी अनुकरणासाठी कठीण असतात, कारण त्यांच्या लेखनावर त्यांची-त्यांची नाममुद्रा उमटलेली असते. ते अनुववंशहीन असतात. त्यामुळे नवे लेखक त्यांच्या वाटेने जाण्याचा प्रयत्न करू लागले तरी पाच-दहा पावलांतच ते माघारी वळतात, हेही तेवढेच

खरे.

या लेखनप्रकृतीचा विचार करताना एक सशक्त नाव घेण्याचा मोह होतो. आणि ते नाव म्हणजे भारत सासणे. जी. ए. कुलकर्णी यांच्यानंतर एक मोठी झेप घेणारा कथाकार म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. एकाच वेळी वास्तवाधिष्ठित अनुभव आणि अज्ञाताचा शोध घेणारी त्यांची कथा-कादंबरी आज मराठी साहित्यात गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे भक्कमपणे उभी आहे. कथा, दीर्घकथा, लघुकादंबरी, नाटक अशा वेगवेगळ्या आकृतिबंधांतून सासणे वास्तव, अतिवास्तव, फँटसी, रूपक अशा अनेकविध अंगाने फिरत जीवनाचे अस्पर्शित वास्तव मांडताना दिसतात.

याउलट सामाजिक परिवर्तनाच्या अंगाने, स्थित्यंतरांच्या दिशेने जाणारी मोठी परंपरा मराठी साहित्यात आहे. या लेखनाची परंपरा मराठी साहित्यात पूर्वापार, प्राचीन अशी आहे. आणि आपण आपल्या लेखनासाठी सातत्याने नव्या-नव्या विषयांच्या शोधात असतो. या लेखनाला दुसरे नाव समस्याप्रधान लेखन असेही आहे. उदा. गोविंद बल्लाळ देवलांचे 'शारदा' हे नाटक, एखादा नवा विषय आपल्या लेखनातून येत असेल आणि त्या लेखनाकडे आधी वाचकांचे, जाणकारांचे लक्ष जात असेल तर ते विषयाच्या नावीन्यामुळे; पण एवढ्यावरच ते लेखन महत्त्वाचे ठरत नाही. त्या लेखनाची प्रकृती सांगणारे ते एक वैशिष्ट्य ठरते. त्यापलीकडे ते टिकते ते त्यातील मानवी जीवनातील मूळ वृत्ती-प्रवृत्तींच्या दर्शनामुळे. कालातीत आशयामुळे. ती त्या-त्या काळातली समस्या असली तर त्यातील व्यक्तींचे वर्तन, नातेसंबंध, बदलते आस्थाबंध या गोष्टी कालातीत होऊन जातात. म्हणूनच या लेखनाला महत्त्व असते. उदाहरणार्थ, व्यंकटेश माडगूळकरांची 'बस सर्व्हिस' ही कथा घेऊ. या कथेवर माडगूळकरांनी 'तू वेडा कुंभार' हे नाटकही लिहिले आहे. यात गावात बस सुरू झाल्यानंतर बदलू लागलेल्या मूल्यांची, होऊ लागलेल्या वाताहतीची आणि मानवी स्वभावातील आसक्ती-लोभाची वेगळ्या पातळ्यांवरून येणारी प्रचीती ही काही त्या काळापुरती सीमित नसते, तर ती प्रातिनिधिक, सार्वकालिक ठरते आणि स्वातंत्र्यानंतर बदलत्या सामाजिक संदर्भातील झालेले लेखन महत्त्वाचे लेखन म्हणून गणले जाते. राजकीय, सामाजिक परिस्थिती बदलली की माणसांची मूल्येही बदलतात. हिंदी साहित्यातील एक कादंबरीकार फणीश्वरनाथ रेणू यांची 'मैला आंचल' ही कादंबरी त्या

दृष्टीने भारतीय साहित्यात मैलाचा दगड म्हणून गणली जाते. मराठीत फारशी चर्चा न झालेली वसंत वरखेडकर यांची 'प्रतिनिधी' ही कादंबरीही या दृष्टीने तपासून पाहता येईल. किंवा त्र्यं. वि. सरदेशमुखांची 'डांगोरा एका नगरीचा' या कादंबरीचाही उल्लेख राजकीय रूपक म्हणून विचारात घेता येईल. राजकीय रूपकाचा मराठी साहित्यात झालेला प्रयोग फार मोठा नसला तरी तो काही उदाहरणांच्या दृष्टीने फार अर्थपूर्ण आहे, असे म्हणावे लागेल. या प्रयोगाचे एक ताजे उदाहरण म्हणजे नागनाथ कोत्तापल्ले यांची अगदी नव्याने आलेली 'काल-त्रिकाल' ही बृहद कादंबरी. या कादंबरीत कोत्तापल्लेनी वापरलेले राजकीय रूपक अधिक अर्थपूर्ण असे आहे. राजेशाही, घराणेशाही, धर्मांध सत्ता, राजकीय प्रभुत्वाच्या सातत्यासाठी केला जाणारा धर्माचा आणि दंडशक्तीचा वापर आणि त्या सगळ्या काळाचा, सामान्य जनतेचा लोकशाही मूल्यांच्या अंगाने होऊ लागलेला प्रवास याचे अतिशय वेधक आणि प्रातिभ पातळीवरील श्रेष्ठत्वाकडे जाणारे चित्रण मुधोळ संस्थानाच्या माध्यमातून त्यांनी उभे केले आहे. ही कादंबरी वाचताना सातत्याने समकालीन राजकीय परिप्रेक्ष्य समोर उभे राहते. आणि ध्वन्यर्थाच्या अंगाने आपण समाज वास्तवाची मांडणी कशी करू शकतो, याचा अतिशय सुंदर असा वस्तुपाठ म्हणून 'काल-त्रिकाल' कादंबरीकडे पाहू लागतो. एवढी सुंदर, अर्थपूर्ण कादंबरी आमच्या हाती सोपवून हा प्रतिभासंपन्न लेखक, समाजभानाचा सातत्याने साहित्याच्या संदर्भात विचार करणारा हा आमचा मित्र, माझा वाङ्मयीन सहोदर काळाने हिरावून नेला, हे दुःख फार मोठे आहे.

विषयातील नावीन्य आणि कालातीतता

मराठी साहित्यात नव्या, ताज्या विषयांना मराठी नाटकांनी अधिक प्राधान्याने रसिकांसमोर आणले. आणि यात अनिल बर्वे हा नाटककार, कादंबरीकार अग्रेसर होता. सरोगसी मदरसारखा विषय त्यांनी कधीचाच आपल्या 'पुत्रकामेष्टी' सारख्या नाटकातून आणला. त्यांच्या 'डोंगर म्हातारा झाला', 'युद्धविराम' कादंबऱ्यासुद्धा वेगळ्या विषयांवरच्या म्हणून उल्लेखिता येतील. अर्थात नवीन आणि ताजे विषय असले की ती कलाकृती श्रेष्ठ ठरते, असे मानणे चुकीचे ठरेल. शेवटी विषय कुठलाही असला तरी त्यात जीवनविषयक गंभीर दृष्टीकोन आणि कालातीत आशय किती आहे, यालाच

नवी संहिता... नवा आशय...

कान्होजी आंग्रे



मनोहर माळगांवकर

अनुवाद

पु. ल. देशपांडे

दर्यावर स्वार होणारे वीर कान्होजी आंग्रे यांच्या थरारक कारनाम्यांचा वेध घेणारी मनोहर माळगांवकर लिखित आणि पु. ल. देशपांडेंनी अनुवादित केलेली कादंबरी

किंमत : ४२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

असा असावा जोडीदार...

तिच्या स्वप्नातला कणखर पुरुष होण्याचा मूलमंत्र

इलियट काट्झ

अनुवाद

गौरी देशपांडे

स्त्रीची अपेक्षा... पुरुषाची परीक्षा... कसं व्हावं या परीक्षेत पास... याचं मार्गदर्शन करेल हे पुस्तक खास.

किंमत : १४०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.

अधिक महत्त्व असते. म्हणूनच खानोलकरांच्या 'रखेली' या नाटकापेक्षा त्यांच्या 'एक शून्य बाजीराव'ला अधिक महत्त्व आहे. तेंडुलकरांच्या 'श्रीमंत'पेक्षा 'सखाराम बाइंडर' अधिक महत्त्वाचे मानले जाते. किंवा वि.वा शिरवाडकर यांच्या 'नटसम्राट' ला कालातीत महत्त्व प्राप्त होतं ते यामुळेच. अर्थात हे सगळं मान्य करूनही सामाजिक भानाच्या दृष्टीने, घटनांच्या दृष्टीने हा लेखक किती सजग आहे हेही महत्त्वाचे ठरते. शेवटी कलाकृती ही नव्या किंवा जुन्या विषयावरील आहे यापेक्षा ती कोणता आशय मांडते, याला अधिक महत्त्व आहे.

या सबंध विवेचनानंतर सामाजिक, राजकीय घटना आणि मराठी लेखक यांचा काय संबंध आहे, यावरही काही मते मांडणे महत्त्वाचे वाटते. आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनांशी आपले प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नाते असतेच; कारण त्या-त्या घटनांनी आपल्या जीवनात काही वादळे येतात. आलेली असतात. आपल्या जीवनमूल्यांवर त्यामुळे बरे-वाईट आघात होत असतात. एक जागतिक उदाहरण देण्याचा मोह या ठिकाणी होतो. नेपोलियनच्या रशियावरील आक्रमणाने संपूर्ण रशियाच तळामुळातून हलला होता. आता ही झाली घडलेली घटना; पण याच घटनेवर लिओ टॉलस्टॉयची 'वॉर ॲन्ड पीस' आली आणि त्यात नेपोलियनची रशियावर स्वारी ही घटना दुय्यम ठरते आणि संपूर्ण रशियन समाजाची वाताहत आणि पुन:स्थापना हा आशय प्रधान होतो.

भारतीय राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमीवर मागच्या शतकाच्या उत्तरार्धात काही महत्त्वाच्या घटना घडून गेल्या. त्यातली महत्त्वाची घटना म्हणजे १९७५ची आणीबाणी. किंवा त्यानंतरच्या आणखी काही राष्ट्रीय स्तरांवरील काही घटना घेता येतील. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात अशा घटनांनी होणारी उलथापालथ खूप विमनस्क करणारी ठरते. माणसे आपल्या मुळापासून उद्ध्वस्त होतात. हे परिणाम केवळ राजकीय नसतात तर ते सामाजिक, मानसिक, धार्मिक अशा सगळ्याच अंगांनी गावपातळ्यांवर दीर्घकालीन स्वरूपात उमटतात. मराठी कादंबरी इथे कुठे आहे? 'संधिकाल' (मधु मंगेश कर्णिक), 'ताम्रपट' आणि 'दिवे गेलेले दिवस' (रंगनाथ पठारे) इत्यादी कादंबऱ्यांतून आणीबाणीचे काही संदर्भ म्हणून या घटना येतात. आत्मस्तुतीचा दोष पत्करून 'पडघम'चा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते.

याच काळातला मराठवाड्यातील भूकंप किंवा १९९३चा मुंबईत घडून आलेला बॉम्बस्फोट आणि त्यात उद्ध्वस्त झालेली शेकडो कुटुंबे, मारली गेलेली हजारो माणसे - या घटना मराठी कादंबरीत कुठाय? मणिरत्नमचा 'बॉम्बे' हा चित्रपट आठवा. किंवा याच घटनेवर वेगळ्या शैलीतली २००७ साली हिंदीत प्रकाशित झालेली दूधनाथ सिंह यांची 'आखिरी कलाम' ही कादंबरी वाचली की मराठी साहित्याची, कादंबरीची प्रकृती आपल्यासमोर आल्यावाचून राहत नाही. घडणाऱ्या घटना आणि त्यावर लिहायला घेतलेले लेखन यात बऱ्यापैकी काळाचे अंतर असावे, तो अनुभव लेखकाच्या मनावर खोलवर रुजणे, परिपक्व होणे आवश्यक असते; पण तो परिपक्व होण्याची वाट पाहता-पाहता शिळाही होऊ नये. मराठीत श्रेष्ठ कलाकृतीच्या संदर्भात असणाऱ्या काही मोजपट्ट्या पाहिल्या की अनेक महत्त्वाच्या कलाकृती का आणि कशा नजरेआड केल्या जातात किंवा अनुल्लेखांनी मारल्या जातात याचे उत्तर मिळते. यात प्रभाकर पेंढारकर यांची 'रारंग ढांग, अनंत सामंत यांची 'एम टी आयवा मारू', अरुण साधू यांची 'शोधयात्रा' इत्यादी कादंबऱ्यांची उदाहरणे देता येतील. एक-दोन उल्लेख काही वेगळ्या संदर्भात करू इच्छितो. मराठी साहित्यात नवकथेचे मानदंड म्हणून चार कथाकारांच्या वाङ्मयीन कार्याचे स्मरण इथे करणे गरजेचे आहे. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले आणि माडगूळकरांसोबतच आमच्या नागपूरच्या पु. भा. भाव्यांनीही मराठी नवकथेला शैलीचे देणे दिले आहे, हे त्यांचे वाङ्मयीन मोठेपण नाकारता येणार नाही. पुढे ही कथा अधिक लोकप्रिय करण्यासाठी, जनमानसात रुजवण्यासाठी व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील आणि द. मा. मिरासदार यांनी केलेले कार्य मराठी साहित्याच्या इतिहासात अधोरेखित करण्याएवढे महत्त्वाचे आहे.

साठोत्तरी प्रवाह : नव्या वाटा

मराठीत साठोत्तरी काळात दलित साहित्याचा मोठा प्रवाह वेगाने आला आणि संपूर्ण जाणकार वाचकांचे, रसिकांचे लक्ष त्याकडे वेधले गेले. युगानुयुगांपासूनची ठसठसती वेदना, दु:ख त्या साहित्यातून व्यक्त होऊ लागले. त्यात व्यक्त होणाऱ्या विद्रोहाने इथल्या पारंपरिक मूल्यांना जबरदस्त हादरे देत हे साहित्य एका दशकाच्या आतच प्रस्थापित झाले. या साहित्याचा

अमोघ वेग आणि जीवनानुभव पाहता श्रेष्ठ, भारतीय पातळीवरची महाकादंबरी दलित साहित्यातून जन्माला येईल असा विश्वास अनेक जाणकारांनी व्यक्त केला होता; पण जवळ- जवळ पन्नास वर्षे उलटूनही या अपेक्षा मात्र त्या साहित्याने पूर्ण केल्या नाहीत, असे तटस्थपणे विचार करता म्हणावे लागते. काही लक्षवेधी चांगल्या कादंबऱ्या नक्कीच या साहित्याने दिल्यात; त्या सगळ्यांच्या आदराचा विषयही ठरल्या. बाबुराव बागूलांच्या 'सूड'सारख्या लघुकादंबरीने आपण हादरतोच. नामदेव कांबळेंच्या 'राघववेळ' या त्रयीने एक महत्त्वाचा प्रयत्न केला आहे. शरणकुमार लिंबाळे आपल्या परीने शोध घेत दलित साहित्याला सरस्वती पुरस्कार मिळवून देणारा लेखक म्हणून ताठपणे उभा राहिला; पण पुढे काय? मराठी दलित साहित्य कविता आणि स्वकथने इतपतच सीमित राहिली आहेत का? यातील समीक्षा ही त्या साहित्याच्या प्रस्थापनेसाठी कामी आली. मराठी दलित साहित्याने मराठी साहित्यातील आत्मचरित्राचे दालन अधिक समृद्ध केले; पण हाच अडसर श्रेष्ठ कादंबरीसाठी आड आला असेही म्हणावे लागते. दलित साहित्यातले बहुतांशी लेखक आपल्या पहिल्यावहिल्या स्वकथनाने प्रसिद्धीच्या झोतात आले आणि आतून रिते झाले. सगळा शक्तिपात झाल्यासारखी या लेखकांची अवस्था झाली. आपल्या जवळचा सगळाच ऐवज ओतून झाल्यानंतर पुन्हा सांगण्यासारखे काहीही राहिले नाही, ही वस्तुस्थिती त्यांना कळली आणि मग हीच पहिल्या- वहिल्या कलाकृतीने मान्यवर झालेली मंडळी एक तर विचारवंत होण्यासाठी धडपडू लागली. किंवा त्या लेखनाच्या पुण्याईवर राजकीय हितसंबंध सांधू लागली. यातली बऱ्यापैकी मंडळी राजकीय व्यासपीठावर वावरू लागलेली आणि आपल्याच समाजाला विसरलेली दिसू लागली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाला, विचारांना आपल्या सोयीने मुडपून घेऊ लागली. हे कमी की काय म्हणून दलित साहित्य की आंबेडकरवादी साहित्य असल्या वादाच्या रणधुमाळीत आपापले गट-तट तयार करून अनुभवाच्या कसदार मांडणीपासून हे साहित्य दूर गेले. एका मोठ्या साहित्यप्रवाहाला मराठी साहित्य पारखे झाले. आज या प्रवाहाला ऐतिहासिक प्रवाह म्हणून आपण अभ्यासात ठेवणार आहोत की काय अशी शंका येऊ लागते. आणि यामागील कारणांचा शोध घेतला तर असे दिसते की हे लेखक आपल्या वर्तुळापलीकडील समाजातील अनुभव

आणि त्या अनुभवातील ताणेबाणे समजून घेऊन त्यावर आंबेडकरी विचारांचे कलम करून तो अनुभव साहित्यात मांडू शकले नाहीत; कारण आज दलित समाजासमोरील प्रश्न आणि बहुजन समाजातील प्रश्न यात फारसा फरक राहिलेला नाही. उदाहरणच सांगायचे तर पुढे ते जागतिकीकरणाच्या संदर्भात सांगता येईल.

नव्वदोत्तरी उन्मेष, देशीवाद आणि खाउजा संस्कृती

साठोत्तरी काळात जन्मलेली आमची पिढी नव्वदीच्या उंबरठ्यावर लेखन करती झाली. याच काळात आनंद यादवांनी आधुनिक ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू केली होती. शहरी सुधारणा, मूल्ये, जगण्याच्या तऱ्हा, यंत्र, बदलती शेती आणि त्यामुळे बदलत जाणारी ग्रामीण समाजव्यवस्था, गावगाडा या साहित्य चळवळीतून जन्माला आला. सहकार क्षेत्रामुळे, ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे गाव-खेड्यांतही आमूलाग्र बदल होऊ लागले होते. खेड्याकडे चला, तिथल्या लघुउद्योगाला प्राधान्य द्या, या- महात्मा गांधीजींच्या हाकेच्या संदर्भात विचार केला तर प्रस्तुत बदल अगदीच विरुद्ध होते; पण हा बदलत्या काळाचा रेटा नाकारता येत नव्हता. या रेट्याचे आणि गावगाड्यातील स्थित्यंतराचे अधिक यशस्वी चित्रण आनंद यादवांनी 'गोतावळा'मध्ये केले. तोच आशय घेऊन रा. रं. बोराडेंची 'पाचोळा' आली. १९७५ ते १९९० या काळात या प्रकृतीच्या लेखनाने मराठी साहित्यात आपले वेगळे अस्तित्व सिद्ध केले. ग्रामीण भागात जन्मलेली आणि नव्याने लिहू- व्यक्त होऊ लागलेली पिढी या काळात साहित्याच्या क्षितिजावर ठळकपणे दिसू लागली. त्यातूनच ग्रामीण साहित्य परिषदेची स्थापना झाली आणि त्या छताखाली डॉ. आनंद यादवांसोबत रा.रं. बोराडे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव, बाबा पाटील, द.ता. भोसले, अनुराधा गुरव, वासुदेव मुलाटे, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, इंद्रजित भालेराव, सदानंद देशमुख इत्यादी मंडळी येऊन साहित्यात आपल्यापरीने आपली अभिव्यक्ती करू लागली; पण १९९२नंतर भारत सरकारने मुक्त बाजारपेठेचे धोरण स्वीकारले. त्यातून खाउजा संस्कृती उदयास आली आणि पुढे याच वाटेने जात देशीवादाने जन्म घेतला. आणि मग आपली आंतरिक गरज म्हणून ग्रामीण साहित्य चळवळीतले बहुसंख्य

लेखक, कवी या देशीवादाचे समर्थन करते झाले. तिकडून पक्षांतर केल्यासारखे ते इकडे दाखल झाले.

१९९२ सालानंतर आपण खुली अर्थव्यवस्था स्वीकारली नसती तर आपला देश भिकेला लागला असता. भारताची बाजारपेठ तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी जगाला खुली करून दिली आणि भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला. या जागतिकीकरणात अनेक गोष्टी पैशांसोबातच भारतात आल्या. भारतीय समाजाचे, अर्थव्यवस्थेचे एक वेगळे चित्र उभे राहिले. 'Globalization and Politics in India' या २००७ साली ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने प्रकाशित केलेल्या आणि बलदेव राज नायर यांनी संपादित केलेल्या ग्रंथात अनेक लेखकांनी जागतिकीकरणाच्या संदर्भात अधिक तात्त्विक मीमांसा केली आहे.

The benefits of integration with the world economy, through globalization, world accrue only to those countries which have laid the requisite foundations for industrialisation and development. This means investing in the development of human resources and the creation of a physical infrastructure. This means raising productivity in the agricultural sector. This means using strategic industrial policy for the development of technological and managerial capabilities at a micro level. हा जागतिकीकरणाचा अर्थ विशद करणारा त्यातील दीपक नय्यर यांचा लेख ही संज्ञा अधिक स्पष्ट करून सांगणारा आहे.

१९९२ साली भारतात प्रवेश करत्या झालेल्या या जागतिकीकरणाने २००० च्या आसपास आपली पाळेमुळे भारतात सर्वत्र पसरविल्याचे चित्र दिसून येते. या पार्श्वभूमीवर श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूरच्या वतीने आयोजित केलेल्या व्याख्यानसत्रांतून सर्वप्रथम देशीवादाची जाहीर चर्चा घडवून आणली गेली. आणि मग मराठी साहित्यात देशीवाद विरुद्ध जागतिकीकरण असे खुले युद्ध सुरू झाले. देशीवादाची मांडणी करताना देशीवादी मंडळींनी ग्रामीण व्यवस्था, कृषिसंस्कृती, ग्रामनियत रीतिभाती, जल-जंगल-जमीन इत्यादी संबंधीच्या ऱ्हासाच्या, अवनतीच्या संदर्भात घेतलेली भूमिका महत्त्वाची मानली जाऊ लागली आहे. आणि या देशीवादाचे जनक किंवा उद्‌गाते

नवी संहिता... नवा आशय...

ॲन इनकम्प्लीट लाइफ

विजयपत सिंघानिया

अनुवाद

दीपक कुळकर्णी



विमान उड्डाण असो वा हॉट एअर बलून, आकाशाशी स्पर्धा करणाऱ्या अवलिया उद्योगपतीची जीवनगाथा...

किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

आकु-आकु

थॉर हेयेरडाल

अनुवाद

श्रीया भागवत



'आकु-आकुं'चे चमत्कारी गूढ, मानवी मनातील भीतीचे सैतानी धूड

किंमत : ६२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.

म्हणून हे श्रेय रा. रा. भालचंद्र नेमाडे यांना दिले जाते. पुणे येथे २०१० साली भरलेल्या अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या एका परिसंवादाच्या अध्यक्षीय पदावरून बोलताना डॉ. गो. मा. पवार असे म्हणाले होते की- मराठीने - पर्यायाने भारताने जगाला दोन साहित्यविषयक देणग्या दिल्या आहेत. पहिली दलित साहित्याची आणि दुसरी म्हणजे देशीवादाची किंवा नेटिव्हिझमची, त्यातला 'नेटिव्ह' हा शब्द महत्त्वाचा आहे.

जागतिकीकरणाचा प्रारंभ नव्वदोत्तरी असा मनाला जातो; पण जागतिकीकरणाची खरी सुरुवात वास्को-द-गामाने भारताच्या किनाऱ्यावर पहिले पाऊल ठेवले तेव्हापासूनच झाली असेही समजतात. भारताची व्यापारी पेठ तेव्हाच जागतिक व्यापारासाठी खुली झाली होती. आज त्याला वेगळी परिमाणे मिळाली आहेत, एवढेच. ही परिमाणे प्रगत औद्योगीकरणाची, तंत्रज्ञानाची आहेत. आता या जागतिकीकरणाच्या सगळ्याच गोष्टींना विरोध करायचा का? आणि असा आपण कितीही निकराचा विरोध केला तरी जागतिकीकरणाचा हा प्रपात कोसळायचा राहील का? उलट तो कोसळतच जाणार; कारण आज आपण ज्या काळात उभे आहोत त्या काळाच्या काही भौतिक, सांस्कृतिक, औद्योगिक गरजा आहेत, हे कसे नाकारायचे? भालचंद्र नेमाडे देशीवादासंबंधी म्हणतात- जागतिकीकरणाला थोपवून धरणारं देशी परंपरेसारखं दुसरं कोणतंही अमोघ शस्त्र नाही. तुमची परंपरा डोळसपणे सुरू ठेवली ना की तुम्हाला नाहीसं होण्याची भीती नाही. तुम्ही जुन्या काळाप्रमाणे मुंडासं वापरत असाल तर तुम्हाला नव्या हॅटचा धोका नाही; पण तुम्ही बोडके राहिलात तर हॅटचा धोका आहे; कारण हॅट अशा रिकाम्या जागेवर बसू शकते. हॅटच्या ठिकाणी परदेशी संस्कृतीचं कोणतंही एक तत्त्व म्हणून पोशाख- रचनेमधला एक syntagm म्हणून मी हे रूपक वापरले. प्रत्येक परंपरेचं असं आहे, तिथे पोकळी निर्माण झाली तर आपोआप आगंतुक परक्या क्रयवस्तूने ती पोकळी भरून निघेल आणि ती तुमच्या इच्छेशिवाय भरून निघणार. हे विवेचन लक्षात घेतले की या देशीवादाचे सूत्र हाती येते.

समजा, हे देशीवादाचे सूत्र स्वीकारत आपण जागतिकीकरण नाकारले तर काय? नेमाडेंनी पोशाखाचेच रूपक वापरले म्हणून मीही तेच वापरतो. जीन्स पॅन्ट आणि टी शर्ट घालून आपण जागतिकीकरण नाकारणार का?

मोबाइल फोनवरून किंवा आय फोनवरून आपण देशीवादाच्या गप्पा मारणार काय? लॅपटॉपवर आपण देशीवादी कादंबरी लिहून जागतिकीकरणाला हद्दपार करणार का? ब्रेनडेनची शिकार झालेल्या आणि अमेरिका-इंग्लंडसारख्या किंवा ऑस्ट्रेलियासारख्या देशात आपल्या मुलांना नोकरीसाठी पाठवून आणि त्यांना तिकडचे ग्रीन कार्ड मिळावे म्हणून त्यांच्या धडपडीचं कौतुक करणाऱ्या बापाने देशीवादी असल्याचा झेंडा हाती घेऊन नाचावं, यात देशीवाद आपण किती प्रामाणिकपणे स्वीकारला आहे? शेती, नद्या, भाषा, संस्कृती यांच्यावर होणाऱ्या तत्सम प्रभावामुळे, इथल्या देशी संस्कृतीला धक्का पोहोचत आहे असे म्हणणारे या जागतिकीकरणावर आगपाखड करण्यापेक्षा इथल्या सरकारी धोरणांवर का पेटून उठत नाहीत? इथली राजकीय सत्ता या सगळ्यांच्या मध्ये दत्त म्हणून उभी असते हे आपण का सोयीस्करपणे विसरतो? नद्यांचं पाणी अडवतं कोण? नद्यांमधील रेतीघाट तयार करून नद्या रखरखीत कोण करतं? जागतिकीकरण की इथली राजकीय व्यवस्था? जागतिकीकरण नावाची कुठली हाडामांसाची व्यक्ती अस्तित्वात आहे? शेवटी जागतिकीकरण हे एक धोरण आहे आणि त्या धोरणाची अंमलबजावणी करणे हे आपल्या शासनाच्या हाती आहे. आजच्या या विशी-पंचविशीच्या पिढीच्या दृष्टीने हा देशीवाद निव्वळ हास्यास्पद ठरू शकेल, इतका तो अव्यवहार्य आहे. तुमचं करिअर घडविण्यासाठी आज तरी जागतिकीकरणाशिवाय तुम्हाला पर्याय नाही. मग केवळ आपण वेगळे विचारवंत आहोत या अट्टहासापोटी हे तत्त्वज्ञान मांडत जातो का? हे पारंपरिक तत्त्वज्ञान मांडून आपण आणखी नवे ते काय सांगतो?

देशीवादाची दिशा

देशीवादाचे तत्त्वज्ञान पारंपरिक आहे हे देशीवादीही मान्य करतात. त्याचे एक मासलेदार उदाहरण देतो. देशीवादाचे खंदे समर्थक असलेले श्री. रंगनाथ पठारे या देशीवादाची मांडणी करताना म्हणतात- 'देशीयतेचा अतिरेक एखाद्या समाजाला आत्मकेंद्रित करून ऱ्हासशील करू शकतो. देशीपणाच्या जाणिवेत भावनाप्रधानता व काव्यात्मकता अधिक असते तर विवेकशीलता त्यामानाने कमी असते. परंपराभिमुखता जास्त आणि आधुनिकता कमी असते. तिचे तोंड भविष्यकाळापेक्षा भूतकाळाकडे जास्त वळलेले

असते. देशीपणाचे तत्त्व गतिशील न ठरता स्थितिशीलतेच्या जवळ जाणारे वाटते. सनातनी, प्रतिगामी वृत्तींशी हातमिळवणी करण्याकडे देशीयतेचा कल असतो.' खरा देशीवाद, ग्रामजीवनातील कृषिसंस्कृतीतील सर्व आयामांसह पावणे दोनशे वर्षांपूर्वी पुरोगामी दृष्टिकोनातून महात्मा जोतिराव फुले यांनी वेगळ्या शब्दांत मांडून ठेवला आहे. हेच विचार त्रिंबक नारायण आत्रे यांनी आपल्या 'गावगाडा' मधून बरोबर शंभर वर्षांपूर्वी ग्रामसंरचनेसह मांडलेले आहेत. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी १९५५ मध्ये लिहिलेल्या 'ग्रामगीता' या ग्रंथातून ग्रामविज्ञान, ग्रामसंरचना मांडून हा विचार अधिक स्पष्टपणे दृग्गोचर केला आहे; पण देशीवादी मंडळींना 'ग्रामगीता' ठाऊक असेल तर ना? देशीवादाचीही झलक पाहता मराठी ललित साहित्यात आलेला देशीवाद हाही तपासून पाहता येईल.

जातिव्यवस्था अधिक घट्ट करणे, ग्रामीण व्यवस्थेतील सरंमाजी व्यवस्था अधिक बळकट करणे, जातीय उतरंड अधिक मजबूत करणे हे देशीवादाचे एक सूत्र आहे. 'हिंदू'मधील खंडेरावाच्या चिंतनातून, आठवणींतून ते अधिक प्रखरपणे व्यक्त होत जाते. आम्ही साहित्यातून पुढे जायचे की आणखी मागे यायचे, असा प्रश्न वाचकांना पडतो. जातिव्यवस्थेचे समर्थन करताना प्रा. पठारे एक मुद्दा आणखी मांडतात. ते म्हणतात- 'माणसाचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्याला दोन अक्षात स्वतःला उभे करावे लागते, जातिव्यवस्था आणि देशव्यवस्था या दोन बृहदव्यवस्था दोन अक्ष म्हणून काम करते.' या विधानातली गल्लत केवळ देशीपणाची पाठराखण करण्याच्या संदर्भात अधिक ठळक होते. देशीपणा ही एक ओळख आपण समजू शकतो. उदा. मी भारतीय आहे- ही आपली ओळख असेल तर दुसरी ओळख, ती प्रांतिक ओळख असू शकते. उदा. मी भारतीय असून मी महाराष्ट्रीय आहे. मी भारतीय असून कुणबी, तेली, माळी, शिंपी, मराठा, ब्राह्मण आहे अशी आपली ओळख आपण कधी सांगतो का? आणि आजच्या तरुण पिढीच्या मनात ही जात किती प्रमाणात आहे? त्यांच्या मनाला जातीची साधी कल्पनाही शिवत नाही, आज बहुसंख्य प्रमाणात होणारे आंतरजातीय विवाह पाहता या तरुण पिढीला आपण कोणता देशीवाद सांगणार आहोत? याचा दुसरा अर्थ या देशीवादाचे वय किती? आणि हा देशीवाद कुणी कुणाला सांगायचा? पठारेंच्याच विधानाचा आधार

घेता आणखी एक वैचारिक गोंधळ स्पष्ट दिसतो. बहुतेक देशीवादी स्वतःला पुरोगामी समजतात. आता हा देशीवादच जर प्रतिगामी दिशेने झुकत असेल तर ही मंडळी एकतर गोंधळलेली आहेत, नाहीतर खोटी आहेत, असे म्हणावे लागते.

तथापि, देशीवादी लेखनाला अलीकडे फारच चांगले दिवस आलेले आहेत. देशपातळीवरील पुरस्कार या देशी साहित्याला पट्कन मिळतात. कदाचित या पुरस्कारांची ती एकमेव फुटपट्टी असेल. साठनंतर मराठी साहित्यात आलेल्या दलित साहित्याच्या जोरकस पुरोगामी, ऊर्ध्वमुखी आणि समतेची स्वप्ने पाहणाऱ्या या प्रवाहाला मोठ्या कौशल्याने बगल देण्याच्या, शह देण्याच्या छुप्या कारस्थानातून ही देशीवादाची संकल्पना अस्तित्वात आली आणि सरंजामी व्यवस्थेला अधिक बळकटी आली. दलित साहित्याने फुले, राजर्षी शाहू आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आपले अधिष्ठान म्हणून स्वीकारले होते; कारण जगाच्या पाठीवरील कुठल्याही नव्या साहित्याच्या प्रवाहाला, प्रकृतीला, कुठल्यातरी मोठ्या विचारवंताचे ठोस असे वैचारिक अधिष्ठान प्राप्त झाले होते. मग तो मार्क्सवादी साहित्यप्रवाह असेल, ब्लॅक लिटरेचरची चळवळ असेल, स्त्रीवादी साहित्याची चळवळ असेल- या सगळ्या चळवळींमागे त्या-त्या विचारवंतांचे मोठे अधिष्ठान होते. देशीवादाच्या मुळाशी असले कोणत्या महापुरुषाचे अधिष्ठान आहे याचा शोध मी अजूनही घेतोच आहे. देश्यभावना ही कुठल्याही साहित्याची- अर्थात भारतीय साहित्याची एक ओळख, खूण असावी असा विचार मांडणे गैर नाही. या विचारांच्या पुष्ट्यर्थ काही अमराठी कलाकृतींचाही संदर्भ देता येईल. उदाहरणार्थ- आर. के. नारायण यांची 'द गाइड' ही कादंबरी किंवा अरविंद अडिगा यांची २००७ साली प्रकाशित झालेली आणि बुकर पारितोषिक विजेती कादंबरी 'द व्हाइट टायगर' या भिन्न काळातल्या दोन कादंबऱ्या समोर ठेवल्या तर जवळजवळ पन्नास वर्षे अंतर असलेल्या या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये भारतीयत्व हे एक सूत्र समान आहे आणि भारतातल्या कुठल्याही प्रांतातल्या कलाकृतीचे हेच एक सूत्र असू शकते.

बोली, तत्सम घटक आणि चिंताक्रांत मध्यमवर्गीय

जागतिकीकरण आणि भाषा-बोली यांच्या संदर्भात गंभीरपणे बोलले जाते. जागतिकीकरणामुळे मराठी बोलीसुद्धा उद्या शिल्लक राहील की नाही अशी भीती वर्तविली जाते. या जागतिकीकरणाने जगाच्या पाठीवरील किती बोली संपल्या आणि किती संपायच्या मार्गावर आहेत, याची मोजदाद भालचंद्र नेमाडेंनी आपल्या देशीवादाच्या निबंधात केली आहे. अर्थात त्यांनी ही आकडेवारी - Atlas of world languages, Dead languages, Red Book या पुस्तकातून घेतली आहे. भारताने जागतिकीकरण स्वीकारले तेव्हा भारतीय भाषांच्या संदर्भातही अशी भीती दर्शविली जात आहे. व्यवहाराची एक भाषा आणि बोलण्याची वेगळी बोली अशी आपल्या बहुतेक समाजाची स्थिती आहे. व्यवहाराच्या भाषेसोबतच उपजीविकेची भाषा अशीही भाषेची वर्गवारी करावी लागेल. जागतिक बाजारपेठेत तुम्हाला ती भाषा वापरल्यावाचून दुसरा पर्याय नाही; कारण भाषिक अभिमानापेक्षा पोटाचे प्रश्न अधिक प्रमाणात महत्त्वाचे असतात. जागतिकीकरण आल्यामुळे खरंच आपल्या भाषा संपणार आहेत का, यावर विचार होणे गरजेचे आहे. बोलींचा ऱ्हास होत आहे, हे नाकारता येत नाही; पण या विविध बोली खरंच आजच्या काळात तग धरून राहणार आहेत का? मुळात बोलींची निर्मिती हीच त्या-त्या जातसमूहाच्या-पोटसमूहाच्या गरजेतून झालेली आहे, हे कसे नाकारायचे? आपल्या समूहातील काही संकेत, चालीरीती, प्रथा सांभाळण्यासाठी, त्या फारशा कुणाला कळू नयेत म्हणून अशा बोली त्या-त्या पोटसमूहात बोलल्या जाऊ लागल्या; पण त्या-त्या जातीतली, पोट समूहातली मुले-मुली शिक्षण घेऊन नोकरदार झालीत आणि त्यांना पुढे आपल्या अस्तित्वासाठी आपल्या व्यावहारिक समाजाची केंद्र म्हणून असलेली प्रमाणभाषा स्वीकारावी लागली. पुढे-पुढे त्यांची मूळ बोली ही त्यांच्याच विस्मरणात जाऊ लागली. त्यांच्या प्रथा, परंपरा या त्यांना आता गैरसोयीच्या होऊ लागल्या; कारण त्या त्यांना या व्यवहारी जगात अनावश्यक वाटू लागल्या आहेत. थोडक्यात, एखाद्या पोटसमूहातील मुले-मुली शिकून नोकरदार झाली की त्यांची बोली हळूहळू संपुष्टात येते. ही नैसर्गिक प्रकिया आहे. उदाहरणेच द्यायची झाली तर आज महाराष्ट्रात पवार, पोवार, पारधी, कोष्टी, बंजारा, लोधी, गोंड इत्यादी पोट समूहाच्या बोली अस्तंगत होत आहेत. आपल्या शरीराच्या ज्या

नवी संहिता... नवा आशय...

अधर्मकांड

उदय भेंब्रे

अनुवाद

अकल्पिता राऊत-देसाई



पोर्तुगीजांच्या धर्मांतररूपी अत्याचाराच्या भीषण वास्तवाचं चित्रण करणारी करुणार्द्र आणि ज्वलंत कादंबरी

किंमत : २७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पडछाया

भाग्यश्री नूलकर



अज्ञान-अंधश्रद्धेचं फोफावलंय वादळ, विज्ञानकथांतून करूया प्रबोधन

किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

अवयवाची गरज संपते तो अवयव काही काळानंतर गळून पडतो. उदाहरणार्थ, पूर्वी आपल्याला शेपटी होती असे म्हणतात; पण नंतर आपली ती शेपटी गळून पडली, हा मानववंशशास्त्रातला एक साधा नियम आहे; पण यामुळे अख्खी मराठी भाषा मरायला टेकली अशा स्वरूपात हा विचार मांडणे शंकास्पद वाटते. गेल्या दोन हजार वर्षांआधीपासून महाराष्ट्रात मराठी होती आणि ती आजतागायत तशीच टिकून आहे. तिची रूपे बदललीत. तीवर परकीय भाषेची आक्रमणे झालीत. त्या आक्रमणांना, अतिक्रमांना आपल्यात पचवीत ती अढळपणे उभी राहिली. यादवकालीन मराठी, बहामनीकालीन मराठी, शिवकालीन मराठी, पंडिती मराठी, आंग्लकालीन मराठी, आधुनिक काळातील मराठी, स्वातंत्र्योत्तर मराठी आणि नव्वदोत्तर मराठी असा मराठी भाषेचा इतिहास पाहिला तर ही भाषा आपल्या स्वत्वासह अजूनही सगळे बदल पचवीत भक्कमपणे उभी आहे, हे नाकारता येत नाही. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा दाखला देता येईल. त्यांच्या राज्याभिषेकाला यावर्षी साडेतीनशे वर्षे होत आहेत. त्यांनी आपल्या दरबारातील भाषा विद्वानांकडून राजव्यवहार कोश तयार करवून घेतला होता, त्यात मराठी-दख्खनीयावनी उर्दू-संस्कृत शब्द होते. त्यातले दहा टक्के शब्द आज प्रचलित आहेत. याचा अर्थ तत्कालीन शासनाची गरज म्हणून हा शब्दकोश सिद्ध झाला होता. आणखी खोलात जाता असे दिसते की त्या काळी राजव्यवहारात आणि समाजातही मराठीतर इतर भाषा अस्तित्वात होत्या. मराठीसोबतच इतर भाषा गरज म्हणून त्या काळीही स्वीकाराव्या लागल्याचे हे उदाहरण आहे. ही मराठी कधीही मारणार नाही; पण ती भीती लोकांच्या मनात घालून काही मंडळी उगाच बागुलबुवा उभा करीत आहेत, हेही तेवढेच खरे. विदर्भ, मराठवाडा, कोकण, माणदेश, खानदेश इत्यादी प्रांतांतल्या बोली जोवर खेडी आहेत तोवर बोलल्या जाणारच. आणि खेडी कधीही संपुष्टात येणार नाहीत. भले त्यात कितीही बदल होवो. ती मानसिकता आणि लोकसंस्कृती काही बदलांसह तशीच टिकून राहणार आहे. आता प्रश्न पडतो या संस्कृतीतील परंपरा, रीतिभाती, लोकप्रथा यांच्या ऱ्हासाचा. या गोष्टी ऱ्हास पावू नयेत, असे अनेक भाषापंडितांना, वैयाकरणींना वाटते. या रीतिभाती, लोकप्रथा, काही प्रमाणात अंधश्रद्धा जर तिथल्या लोकांच्या प्रगतीच्या आड येत असतील तर त्यांचा ऱ्हास अटळ आणि

आवश्यक आहे. ग्रामजीवनातल्या या गोष्टी काही एका मर्यादेपर्यंत तिथल्या बोली, रीतिभातींसाठी पूरक आहेत; पण त्या कायम टिकाव्यात असे ज्या भाषावैज्ञानिकांना वाटते त्यांच्यासमोर युनेस्कोने ठेवलेले रिपोर्ट्स असतात. ते खरेही असतील; पण त्यासाठी गावाखेड्यातल्या, पाड्यातल्या तरुण-तरुणींनी आपल्या शिक्षणासाठी बाहेर पडायचेच नाही का? तिथून बाहेर पडल्याशिवाय त्यांची प्रगती होऊच शकत नाही हे स्पष्ट आहे. आपल्या मुलांना शिक्षणासाठी, मोठ्या पगाराच्या नोकऱ्यांसाठी परदेशी पाठवायचे, त्यांच्या मुलांना, नातवंडांना आपली बोली-भाषा आली नाही तरी चालेल; पण गावपाड्यांतल्या तरुणांनी मात्र त्यांच्या बोली- भाषा-रीतिभातींच्या जपणुकीसाठी मात्र तिथेच, आपल्या गावातच कायमस्वरूपी राहायचे हे अरण्यरुदन किती काळ चालणार आहे ? आज मराठीच्या अधोगतीची कारणे आपण शोधू पाहत आहोत, ती शोधणे हे आपले कर्तव्यही आहे. आणि याला जबाबदार कोण, अशी आपण चांगल्या अर्थाने शोधयात्रा सुरू केली आहे. मी या भाषणाच्या पूर्वपर्वात मांडलेला मुद्दा नाकारता येत नाही. आणि तो म्हणजे शासकीय पातळ्यांवरून मराठीची होऊ पाहणारी उपेक्षा, त्यासोबतच आपली आपल्याच भाषेविषयी असलेली, वाढत चाललेली न्यूनगंडाची भावना. मराठीविषयी, आपल्या भाषेविषयी आपल्या मनात गोडी निर्माण होण्याचे वय किती असते? तर ते वय असते प्राथमिक शाळेचे. किंवा त्यापूर्वी म्हणजे मूल बोलू लागते तेव्हाचे, संध्याकाळच्या प्रार्थना, परवचा, अडगुलं- मडगुलंसारखी बडबडगीते, देवासमोरच्या-तुळशी वृंदावनासमोरच्या प्रार्थना, श्लोक, ऋचा. किमान भजनं. या गोष्टी मूल बोलायच्या वयात त्याच्या कानावर पडू लागल्या तर त्याच्या वाणीला तसे वळण लागते आणि त्याच्यात आपल्या मायबोलीविषयीची गोडी निर्माण होऊ शकते. मूल बोलायला लागतं त्या काळात त्याच्या कानावर इंग्रजी कविता पडतात आणि इथूनच भाषेविषयी, आपल्या मायबोलीविषयी त्याच्या मनात नावड निर्माण होते. दुसरी पायरी मराठीच्या प्राथमिक अभ्यासक्रमाची. हा अभ्यासक्रम ठरविणाऱ्या मंडळींना किमान आपल्या लोकभाषेचे, लोकगीतांचे, संस्कृतीचे ज्ञान असणे गरजेचे असते. आणि ते नसेल तर मुलाच्या मनातली ही मातृभाषेविषयीची नावड अधिकाधिक वाढत जाणार, अन्योक्ती सप्तकसारख्या कविता, गेय कविता आपण अभ्यासल्या म्हणून आपल्या मनात कवितेची

आणि पर्यायाने मातृभाषेची गोडी निर्माण झाली. इथून मातृभाषेविषयी प्रेमाची रुजवात मुलांच्या मनात निर्माण होणे गरजेचे आहे.

माध्यमांची जबाबदारी

या संदर्भातला दुसरा महत्त्वाचा मुद्दा अधिक गंभीर आहे. काही अपवाद सोडला तर बहुतेक मराठी वृत्तपत्रांच्या रविवार पुरवण्या बंद पडलेल्या आहेत. काही आहेत तर त्यात कथा-कविता छापणे बंद झाले आहे. आता कथा-कविता कोण वाचतं, म्हणून वृत्तपत्रांचे मालक सवाल करतात. बालविभाग बहुतेक बंद झाले आहेत. शाळा-महाविद्यालयात एकांकिका-नाटकांचे प्रयोग बंद झाले आहेत. तिथे पाश्चात्त्य धर्तीवरील कार्यक्रमांची रेलचेल असते. ग्रंथालयांची परिस्थिती आणखीच वाईट आहे. याचा संमिश्र परिणाम म्हणून आज मराठी भाषेची, संस्कृतीची पीछेहाट होताना आपल्याला पाहावी लागते.

आपल्या घरात चोवीस तास दूरदर्शनचा डबा बोलत असतो. धो-धो अशा डेली सोप सुरू असतात. कुठल्यातरी गाण्याची, कवितेची पहिली ओळ घेऊन मालिकेची मांडणी केलेली असते. यात किती मालिका बघाव्या अशा असतात? मराठीत शेकडोंनी उत्कृष्ट कादंबऱ्या, कथा, नाटके आहेत; पण आपण या मालिकांच्या कथा पाहिल्या तर आपले अभिरुचीदारिद्र्य जणू अंगावर चालून येणारे असे दिसते. या मालिकांच्या पदरी लेखकांची टीम काम करते. या टीमपैकी किती कलमबहाद्दरांचे चांगल्या साहित्याचे वाचन आहे? आणि याचा दोष शेवटी दर्शकांवर येतो. 'दर्शक असलं काही पाहतच नाही हो ऽ' म्हणून निर्मात्यांचा सूर असतो. तुम्ही चागलं काही द्या, त्यांच्या गळी उतरवा, म्हणजे ते पाहतील ना? त्यांना वाईट पाहायची सवय तुम्हीच लावली ना? मग आता टीआरपीचा विचार जरा या कार्यक्रमांच्या बाबतीत बाजूला ठेवा.

शासन आणि मराठी भाषा

मराठी भाषेविषयीचा, साहित्याविषयीचा विचार करायचा झाला तर तो शासकीय पातळीवरून व्हावा असा विचार मी यापूर्वी मांडला आहे. आपण भारतीय घटनेचा विचार केला तर त्यात राष्ट्रपतींच्या, राज्यपालांच्या अखत्यारीत

बारा जागा नामित सदस्यांसाठी ठेवलेल्या असतात. या बारा जागांवर विविध क्षेत्रांतील प्रतिभासंपन्न मंडळींची नेमणूक करून त्या-त्या क्षेत्राला प्रतिनिधित्व देणे गरजेचे असते; पण आज राज्यसभेवर किंवा विधान परिषदेवर साहित्यिक म्हणून कोण प्रतिनिधित्व करतं? आपल्यासोबत विचारवंत, कलावंत, समाजिक कार्यकर्ते असूच नयेत, असे शासनाला वाटते का? की शासनाला आपल्यासोबत विचारवंत, प्रतिभावंत ठेवण्याची भीती वाटते? आणि अशी भीती वाटत असेल तर ते सामाजिक स्वास्थ्यासाठी अतिशय वाईट आहे. माझ्या माहितीनुसार ना. धों. महानोर आणि रामदास फुटाणे यांच्यानंतर मधल्या काही वर्षांपासून एकही साहित्यिक-कलावंत महाराष्ट्राच्या विधान परिषदेवर सरकारने नेमला नाही. तुम्ही तुमचा वाटा घ्या ना; पण आमचाही वाटा तुम्ही ओढून घेत असाल आणि तुमच्याच माणसांना खूश ठेवत असाल तर हे गाऱ्हाणे कुणापुढे मांडायचे?

हे सगळे खरे असले तरी आजच्या साहित्यविश्वाचा विचार करता नव्या पिढीतील काही आशास्थाने निश्चितपणे खुणावतात. यात विशेषत्वाने नावे घ्यायची तर पी. विठ्ठल, हृषीकेश गुप्ते, गणेश मतकरी, प्रणव सखदेव, मीनाक्षी पाटील, मनस्विनी लता रवींद्र, पवन नालट, नुकताच साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेले कृष्णात खोत, ऐश्वर्य पाटेकर, पंकज भोसले अशा काही लेखक- कवींच्या नावांचा उल्लेख करावा लागेल. यात आणखी काही नावांची भर पडू शकेल. आपल्या अनुभवांना वेगवेगळ्या आकृतिबंधात मांडत आपला शोध घेणारी म्हणून ही पिढी आज काही लक्षवेधी लेखन करीत आहे. प्रणव सखदेव शैलीच्या अंगाने, कधी फॅन्टसी तर कधी चरचरीत वास्तव मांडताना दिसतो तर हृषीकेश गुप्ते जगण्यातील अनेकविध रहस्यांच्या शोधात नवं काही शोधण्याचा प्रयत्न करतो. अनुभव, शैली, जगाकडे पाहण्याची भिन्नस्तरीय दृष्टी यांमुळे ही मंडळी मराठीतील पुढची आशा आहे, असे विश्वासपूर्वक नमूद करावेसे वाटले.

मित्र हो ऽ आपला महाराष्ट्र हा संतांनी घडविलेला, फुले- शाहू- आंबेडकरांच्या वैचारिक अधिष्ठानाने, साने गुरुजींच्या मातृप्रेरणेने, बहिणाबाईंच्या काव्याने विकसित झालेला, अनेका प्रतिभावंतांनी पुलकित केलेला, समाजधुरीणांनी ऊर्ध्वमुखी ठेवलेला, कलावंतांनी, लोकशाहिरांनी गर्जवीत ठेवलेला असा आहे. हा महाराष्ट्र प्रांत भारताच्या भूमीवर सर्वार्थाने अधिक

प्रगत व्हावा यासाठी शासनकर्त्यांचीही तेवढीच जबाबदारी आहे. सर्वसामान्य जनता आणि सरकार वेगळे नाहीत, असे आम्ही मानतो. तुम्हीही हे माना आणि या महाराष्ट्राच्या जनतेच्या गरजेसाठी, त्यांच्या उन्नतीसाठी सरकार कटिबद्ध आहे, हे तुमचे ब्रीद साकारण्यासाठी या व्यासपीठावरून तुम्हीही काही बोध घ्यावा, अशी आमची विनंती आहे. मराठी भाषा, संस्कृती, परंपरा यांच्या अभिवृद्धीसाठी या व्यासपीठावरून मी ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष म्हणून आपणा सगळ्यांना मनापासून आवाहन करीत माझ्या अध्यक्षीय भाषणाला विराम देतो आणि आपली रजा घेतो.

जय महाराष्ट्र !!

रवींद्र शोभणे
१६, पंचदीपनगर,
हॉटेल रॅडीसन ब्लू जवळ,
वर्धा रोड, नागपूर-४४००२५
भ्रमणध्वनी : ९८२२२३०७४३

◆

नवी संहिता... नवा आशय...

कोरोनानंतरचे उद्योगविश्व

डॉ. गिरीश वालावलकर



अनेकविध उद्योगवाटांचा माग काढत नव्या संधीची वाट दाखवणारं मार्गदर्शक पुस्तक

किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

भारताच्या लस–निर्मितीतील प्रगतीची गोष्ट

सज्जन सिंग यादव

अनुवाद

मंजुषा मुळे



गायीच्या आचळांवर येणारे पूमिश्रित फोड ते 'लस मैत्री'

किंमत : ५२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

१६ मार्च ते १५ एप्रिल २०२४ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३१ मार्च दरम्यान खास सवलत

१६ मार्च - झोई जेनी यांचा जन्मदिन

'आकाश बदलताना' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-

---

१७ मार्च - बाळ भागवत यांचा जन्मदिन

'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-

---

१७ मार्च - फ्रँक गिलब्रेथ यांचा जन्मदिन

'चीपर बाय दी डझन' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

---

१९ मार्च - आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन

'सेकंड लेडी', 'द गेस्ट ऑफ ऑनर', 'द मिरॅकल', 'द सेव्हन्थ सिक्रेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ६९९/-

---

२० मार्च - विल्यम डॅलरिंपल यांचा जन्मदिन

'व्हाइट मुघल्स', 'रिटर्न ऑफ अ किंग', 'अराजक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १८४०/- । सवलत किंमत १३८०/-

---

२२ मार्च - सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन

'चाळिशीनंतरची वाटचाल' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-

---

२३ मार्च - डॉ. डेव्हिड जे. श्वार्त्झ यांचा जन्मदिन

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग', 'द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस' 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ५८०/-

---

२५ मार्च - व. पु. काळे यांचा जन्मदिन

व. पु. काळे यांच्या सर्व पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ९०३५/- । सवलत किंमत ६६७२/-

---

२५ मार्च - टॉम मोनाघन यांचा जन्मदिन

'पिझ्झा टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २२९/-

---

२६ मार्च - राहुल गोखले यांचा जन्मदिन

'विज्ञानातील सरस आणि सुरस' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-

---

२६ मार्च - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन

'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १७४/-

---

२६ मार्च - राजशेखर हिरेमठ यांचा जन्मदिन

'मराठी व्याकरण परिचय' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-

---

२६ मार्च - उमेश कदम यांचा जन्मदिन

'एक होता मित्र', 'केवळ मैत्रीसाठी', 'संहार', 'उद्ध्वस्त', 'स्थलांतर', 'झांझिबारी मसाला' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ७९९/-

---

२९ मार्च - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्मदिन

'शेतकऱ्याचा आसूड : महात्मा जोतिराव फुले' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९६/-

२९ मार्च - विवेक शानभाग यांचा जन्मदिन

'घाचर घोचर' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-

३० मार्च - मणी भौमिक यांचा जन्मदिन

'परमेश्वर : एक सांकेतिक नाव' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-

३० मार्च - फिलिप गूल्ड यांचा जन्मदिन

'आयुष्याचा अंतिम संस्कार' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११९/-

खालील संचांवर १ ते १५ एप्रिल दरम्यान खास सवलत

१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन

'बाल परिचर्या' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ५९५/- । सवलत किंमत ३५७/-

१ एप्रिल - सुरेश वसंत नाईक यांचा जन्मदिन

'कविता दोघांची...', 'या सुखांनो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत १९९/-

३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन

'आपली सृष्टी' मालिकेतील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ७९९/-

४ एप्रिल - सौरभ दुग्गल यांचा जन्मदिन

'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-

५ एप्रिल - जोसेफ लेलिव्हेल्ड यांचा जन्मदिन

'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत २९९/-

५ एप्रिल - व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन

व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६६७५/- । सवलत किंमत ४८६१/-

७ एप्रिल - जागतिक आरोग्यदिन

संच १ - 'आरोग्यासाठी योग', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', 'चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'हृदयविकार निवारण', 'चाळिशीनंतरची वाटचाल', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत १२५३/-

संच २ - 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'रूप करा सुरूप', 'गर्भसंस्कार', 'मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ ॲक्युप्रेशर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १२८०/- । सवलत किंमत ८९६/-

७ एप्रिल - अतुल कहाते यांचा जन्मदिन

'ॲडॉल्फ हिटलर','अमेरिकी राष्ट्रपती', 'अंतराळ स्पर्धा','हिलरी क्लिंटन', 'रुपेरी सिंधू', 'शेअरबाजार' 'स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ!', 'वॉरन बफे', 'वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र', 'गुंतवणूक भान', 'बेंजामिन ग्रॅहॅम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३२६५/- । सवलत किंमत २५६१/-

८ एप्रिल - रणजित देसाई यांचा जन्मदिन

रणजित देसाई यांच्या ४२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७५३५/- । सवलत किंमत ५७१५/-

१० एप्रिल - वर्षा अडालजा यांचा जन्मदिन

'अणसार' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-

१० एप्रिल - एच.व्ही. सरदेसाई यांचा जन्मदिन

'धन्वंतरी घरोघरी' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२९/-

---

११ एप्रिल - डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन

'भारतीय साहित्यिक', 'खाली जमीन वर आकाश', 'समकालीन साहित्यिक', 'वाङ्मय विचार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ४२०/-

`IN BETWEEN' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २३९/-

---

११ एप्रिल - महात्मा फुले यांचा जन्मदिन

'शेतकऱ्याचा असूड', 'महात्मा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ६१०/- । सवलत किंमत ३६६/-

---

१२ एप्रिल - छाया महाजन यांचा जन्मदिन

'कॉलेज', 'मानसी', 'एकादश कथा', 'यशोदा', 'मुलखावेगळा', 'अज्ञात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १०३०/- । सवलत किंमत ६९९/-

---

१३ एप्रिल - जालियनवाला बाग हत्याकांड दिन

'जालियनवाला बाग' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-

---

१४ एप्रिल - द. मा. मिरासदार यांचा जन्मदिन

द. मा . मिरासदार यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३९७०/- । सवलत किंमत ३०९०/-

---

१४ एप्रिल - आशा आपराद यांचा जन्मदिन

'भोगले जे दुःख त्याला...' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

---

१४ एप्रिल - डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जन्मदिन

'व्हायरस', 'महात्मा', 'धर्मयुद्ध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १०९५/- । सवलत किंमत ६४९/-

'MAHATMA JYOTIRAO PHULE' (English) या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ५४९/-

---

१५ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन

जेफ्री आर्चर यांच्या २७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १२९६०/- । सवलत किंमत ९७२०/-

---

१५ एप्रिल - रवीन्द्र बागडे यांचा जन्मदिन

'बोचकं', 'गटुळं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-

---

१५ एप्रिल - डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन

'कृष्णदेवराय' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २३७/-

◆

❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

website : www.mehtapublishinghouse.com

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा

या ईमेलवर पाठवा. author@mehtapublishinghouse.com

नवी संहिता... नवा आशय...

ईडन

देवदत्त पट्टनायक



देवदत्त पट्टनायक यांच्या प्रदीर्घ अभ्यास आणि आकलनातून साकारलेलं धर्मविषयक चिंतन...

किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

माझदाचे जादूगार

अश्विन सांघी

अनुवाद

मुग्धा गोखले



विश्वभ्रमंती घडवत आत्मपरीक्षणाचा साक्षात्कार घडविणारं अनोखं कथानक असलेली अश्विन सांघी यांच्या 'भारत' मालिकेतील रंगतदार कादंबरी...

किंमत : ५९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

ebook available

भय, थरार आणि उत्कंठेचा
अनोखा मिलाफ साधत वाचकांना
गुंतवून ठेवणारी ख्रिस मुनींची
रंगतदार कादंबरी

द सीक्रेट फ्रेन्ड

लेखक : **ख्रिस मुनी**
अनुवाद : **प्रकाश गोगटे**

अनुवादित कादंबरी

TBC-33 Book - 6

आवर्जून वाचावे असे काही

तोतया नेत्याला करायचा होता रशियाचा सर्वनाश...
सीआयएने त्याच्याभोवती आवळला पाश...
रहस्याची उतरंड रचणारी थरारक कादंबरी

आयकॉन

लेखक : **फ्रेडरिक फोरसाइथ**
अनुवाद : **डॉ. देवदत्त केतकर**

अनुवादित कादंबरी

TBC-34 Book - 1

RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/03/2024 Posting Date : 11/03/2024

आवर्जून वाचावे...







मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

_____

_____

_____